# गंध फुलांचे



वसंत बागुल

# गंध फुलांचे

## कथा संग्रह

वसंत बागुल

ई साहित्य प्रतिष्ठान

# गंध फुलांचे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

### असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

गंध फुलांचे

लेखक व अनुवाद : वसंत बागुल

३०२, न्यु शिवम अपार्टमेंट

स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे

फोन: 0251-2587832, 8149068977

vasant_pandit2002@yahoo.com

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक : ई साहित्य प्रतिष्ठान

www. esahity. com

esahity@gmail. com

प्रकाशन : २६ जून २०१९

©esahity Pratishthan®2019

विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची-लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

## श्री वसंत बागुल : एक कलंदर लेखक



डॉ. वसंत बागुल यांचं ई साहित्य तर्फ़े आज चौदावं पुस्तक प्रकाशित होत आहे.

वसंत बागुल एक मालेगावच्या शाळेतले शिक्षक. पण या सामान्य शिक्षकाने असामान्य काम केले. MA नंतर PhD ला हेन्रिक इब्सेन च्या नाटकांचा अभ्यास करायचा म्हणून ते थेट नॉर्वेजिअन भाषा शिकायला नॉर्वेमध्ये पोचले. नोकरी धंदा सोडून. तिथे राहून, पडतील ती अंगमेहनतीची हलकीसलकी कामं करून तिथली भाषा शिकून त्यांनी इब्सेनच्या मूळ पुस्तकांवरून मराठी अनुवाद केले. आणि आपलं PhD पूर्ण केलं. मग गेले जपानमध्ये तिथल्या साहित्याचा अभ्यास करायला. नंतर न्युयॉर्क (अमेरिका), बर्मिंगहॅम-लंदन-इंग्लंड- फ़्रॅंकफ़ुर्ट (जर्मनी) अशी दुनिया फ़िरून तिथल्या भाषा शिकून त्यांनी डझनभर पुस्तकांचे (नॉर्वेजियन, इंग्लिश, अमेरिकन, जपानी) अनुवाद केले. शिवाय हिंदीतल्या हरिवंशराय बच्चन यांच्या मधुशालाचा मराठीत छंदानुवाद केला आहे. या शिवाय त्यांची स्वतः लिहीलेली नाटके , एकांकिका, लेख, कविता आहेतच. प्रकाशझोतापासून दूर राहिलेला हा एक मनस्वी कलंदर लेखक. त्यांची अजूनही अनेक पुस्तकं आता एक एक करून ई साहित्य मधून वाचकांकडे येतीलच.

वाचकांच्या अभिप्रायांची ते वाट पहात आहेत.

त्यांचा पत्ता


वसंत बागुल, ३०२, न्यु शिवम अपार्टमेंट, स्टेशन रोड, उल्हासनगर-४, जि. ठाणे


फोन: 0251-2587832, 8149068977


vasant_pandit2002@yahoo.com


# वसंत बागूल यांची ई साहित्य तर्फे प्रकाशित पुस्तके

1. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/madhushala_bachchan.pdf
2. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/a_doll_house_vasant_bagul.pdf
3. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/wild_duck_vasant_bagul.pdf
4. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/atitagaman_vasant_bagul.pdf
5. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/dayitva_vasant_bagul.pdf
6. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/little_eyolf_ibsen_vasant_bagul.pdf
7. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/japani_pari_1_vasant_bagul.pdf
8. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/japani_parikatha_2_vasant_bagul.pdf
9. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/japani_pari_3_vasant_bagul.pdf
10. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/american_parikatha_vasant_bagul.pdf
11. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/chandrakor_vasant_bagul.pdf
12. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/ibsen_vasant_bagul.pdf
13. http://www.esahity.com/uploads/5/0/1/2/501218/janshatru_ibsen_vasant_bagul.pdf



हेन्रिक इब्सेन
जीवन आणि नाटके
वसंत बागुल



वसंत बागुल
दायित्व
नाटक



जनशत्रू
वसंत बागुल
हेन्रिक इब्सेन
ENEMY
PEOPLE



मदिरालय
हरिवंशराय बच्चन
वसंत बागुल



जपानी परीकथा
येइ ओझाकी
वसंत बागुल



वसंत बागुल


जपानी परीकथा-3
येइ ओझाकी
वसंत बागुल


वसंत बागुल
हेन्रिक इब्सेन
अ डॉल हाऊस


हेन्रिक इब्सेन
वसंत बागुल


हेन्रिक इब्सेन
द
वाईल्ड
डक
वसंत बागुल


अमेरिकन परिकथा
By
L.FRANK BAUM
CHICAGO NEW YORK
GEORGE M. HILL COMPANY
1901
वसंत बागुल


वसंत बागुल


हेन्रिक इब्सेन
लहानगा आयोल्फ
वसंत बागुल

**Every animal has his or her story, his or her thoughts, daydreams, and interests. All feel joy and love, pain and fear, as we now know beyond any shadow of a doubt. All deserve that the human animal afford them the respect of being cared for with great consideration for those interests or left in peace.**

Ingrid Newkirk

# कथा संग्रह

# गंध फुलांचे

वसंत बागुल

## मनोगत

अनेकविध देशांच्या साहित्य उद्यानातील ही कथापुष्पे वाचकांसमोर ठेवताना अतिशय आनंद होतोय.

‘गंध फुलांचे’ ह्या पुष्पगुच्छातील फुलांचा सुगंध घेऊन वाचकांचे मन प्रफुल्लित होईल ही आशा.

वसंत बागुल

**अनुक्रमणिका**

१) केवड्याचं पान (स्वतंत्र)

२) मंगलमूर्ती (अनुवादित)

३) अभिषेक (स्वतंत्र)

४) घासलेटची दुर्गंधी (अनुवादित)

५) प्रेमाची कला (अनुवादित)

६) खोपा (स्वतंत्र)

७) थॉमस (अनुवादित)

८) सोनेरी मासा (अनुवादित)

९) रम्पेल स्टिल्ट्स कीन (अनुवादित)

१०) चिन चिन कोबा कामा (अनुवादित)

११) राक्षस कोळी

१२) म्हातारी, जिचे कणकेचे गोळे हरवतात (अनुवादित)

१३) मुलगा ज्याने मांजरीची चित्रे काढली (अनुवादित)

१४) सर फेडरिगोचा बहिरी ससाणा (अनुवादित)

१५) कुलीन वारसा (अनुवादित)

कथा – १

# केवड्याचं पान

रवीची नियुक्ती नुकतीच, कॉलेजमध्ये प्राध्यापक म्हणून झाली होती. त्यानंतर एका वर्षानेच त्याचं लग्न, एका सुस्वरूप, सुशील आणि गोड पण स्वच्छंदी स्वभावाच्या किरणशी झालं होतं.

कॉलेजपासून आणि शहरापासून दोन मैलाच्या अंतरावर असलेल्या त्याच्या आजोबांच्या जुन्या बंगल्यात या दोघांनी रहावं अशी गोड सूचना त्याच्या आईवडिलांनी केली. आईला आग्रह करूनही ती आली नाही. कारण शेतीवाडीचा मोठा व्याप, त्यात वडिलांना तिच्याशिवाय कोण मदत करणार? पर्यायाने वडीलही यायला तयार नव्हते. शेवटी रवीने आपल्या बंगल्यावर एक नोकर ठेवून घ्यावा म्हणजे घरातली कामेही होतील आणि बंगल्याची राखणही होईल असे ठरले. त्याप्रमाणे वर्तमानपत्रात रवीने तशी जाहिरातही देऊन टाकली.

जुन्या बंगल्याची साफसफाई करून व रंगरंगोटी देऊन तो उत्तम प्रकारे सजविला गेला. रवी आणि किरण या सुंदर युगुलाने त्यात प्रवेश केल्याबरोबर बंगल्याची शोभा द्विगुणित झाली. किरण थोड्याच दिवसात माहेरच्या आठवणी विसरून रवीच्या जीवनाशी एकरूप होऊन गेली. कारण कुणाचीही दृष्ट लागावी असं त्या दोघांचं एकमेकांवर प्रेम होतं- रवी आणि किरण यांच्या नात्यासारखं अतूट नातं होतं! रेशमाच्या गाठीबरोबर मनाचे धागेही जोडले गेले होते!

रवी, सासऱ्याने घेऊन दिलेल्या स्कूटरवर कॉलेजात जायचा, तेव्हा ‘टाटा’ करण्यासाठी किरण हातातलं काम सोडून बाहेर यायची. तसेच परत येताना काही अंतरावरूनच रवी स्कूटरचा हॉर्न वाजवायचा तशी सारी कामं सोडून किरण त्याचं स्वागत करण्यासाठी अंगणात धावत यायची. मात्र तिच्या अशा धावण्याची रवीला भीती वाटायची. कारण एकदा असाच स्कूटरचा हॉर्न वाजल्यानंतर ती धावत बाहेर आली होती- व पायरीवर असलेल्या बादलीशी टक्कर होऊन जी पडली ती पहिल्या पायरीवरून थेट शेवटच्या पायरीवर! अन् मग रवीही गडबडला होता. स्कूटर बंद करून तशीच सोडून तो तिच्याकडे धावला, तर पाण्याच्या रबरी पाईपात अडकून धाडकन् चिखलात पडला अन् मग काय विचारता, एकमेकाला सावरून

दोघांनी एकमेकांना विचारायची एकच गाठ पडली. 'लागलं का तुम्हाला?' 'लागलं का तुला?' अन् मग दोघेही मनसोक्त हसली होती.

दर रविवारी दोघेही स्कूटरवर शहरात 'शॉपिंग' साठी जायची. शॉपिंग झाल्यावर 'टॉप' आणि 'पॉश' हॉटेलात अल्पोपहार घ्यायची. नंतर चांगलासा चित्रपट असेल तर गर्दी नसतानाही सर्वात महाग तिकीटं काढायची. सिनेमा संपल्यावर फुलवाल्याच्या दुकानातून रवीला अत्यंत आवडणारा केवड्याचा गजरा घेऊन तो स्वतःच किरणच्या वेणीत माळायचा आणि नंतर दोघेही भुर्रकन आपल्या स्कूटरवरून घरी परतायची. सुनसान असलेला बंगला, कधी पतीपत्नीच्या मधुर संभाषणांनी, कधी लाडिक भांडणांनी, तर कधी हसण्या खिदळण्याने गजबजून जायचा.

काही दिवसांनंतर जाहिरातीप्रमाणे एक नोकरही त्यांच्याकडे आला होता. रवीने त्याचं नाव, गाव विचारून व खात्री करून घेऊन त्याला कामाला ठेवले होते. शंकरसारखा आनंदी, हसरा, मननमोकळया स्वभावाचा, सारी कामं कां-कूं न करता करणारा नोकर मिळाला, त्यामुळे किरणची बरीच कामं कमी झाली. एवढंच नव्हे तर सकाळी रवी आणि किरण उठल्यावर सारी कामं आटोपून शंकर त्यांच्यापुढे चहा घेऊन यायचा. शंकरने बंगल्याभोवतीची बाग किरणच्या सुचनेप्रमाणे निरनिराळी फुलझाडे लावून शोभिवंत केली होती.

एके दिवशी रवीने नेहमीप्रमाणे कॉलेजवरून परत येताना स्कूटरचा हॉर्न वाजवला, पण बंगल्यात येईपर्यंत काय, पण स्कूटर शेडमध्ये ठेवीपर्यंत सुद्धा किरण बाहेरही आली नाही, म्हणून रवीला आश्चर्य वाटले व रागही आला. तो झरझर पायऱ्या चढून आत गेला, पण आतही ती नव्हती. सारा बंगला धुंडाळला, शेवटी बंगल्याच्या पाठीमागे असलेल्या बागेत शंकरशी ती काहीतरी बोलत आणि हसत असताना दिसली. रवीला पाहिल्याबरोबर त्यांचं हसणं व बोलणं बंद झालं. रवीला हे सारे विचित्र वाटले व तो संतापाने पावले टाकीत निघून गेला. त्या दिवसानंतर रवी तीन-चार दिवस किरणशी बोलला नाही.

रविवारच्या सुट्टीचा दिवस होता म्हणून रवी जरा उशीराच उठला, व किरण दिसताच वर्तमानपत्र वाचण्याचा बहाणा करू लागला. तरी पण किरण बोललीच, "आज मी स्वतः चहा केला घेणार ना?" आणि असे म्हणत म्हणत तिने त्याला हात धरून उठवले. रवी कसाबसा उभा राहिला तसे त्याचे लक्ष तिच्या वेणीकडे गेले. तिच्या वेणीत असलेला ताज्या केवड्याच्या पानाचा गजरा त्या दोघांच्या भोवताली सुगंध उधळीत होता. त्याने आश्चर्याने विचारले,

'हा गजरा!'

तीन-चार दिवसांनंतर प्रथमच रवी तिच्याशी बोलत होता. तिचा आनंद केवड्यासारखाच फुलुन गेला. ती म्हणाली-

'शंकरने बनवून दिला...'

पुढचं तिचं बोलणं ऐकण्यासाठी रवी क्षणभरही थांबला नाही. किरणचे अंतःकरण चिरीत रवीची स्कूटर भुर्रकन् निघून गेली. रवी गेलेल्या दिशेने किरण संतापाने पण अगतिक होऊन पाहतच राहिली. तेवढ्यात शंकरने चहाचा 'ट्रे' आणला, किरणने तो एकदम उधळून दिला. गरम चहा सांडून किरणचे हात भाजले, पण त्याचे तिला भानच नव्हते. कारण हातापेक्षाही जास्त तिचं अंतःकरण भाजलं होतं.

त्या दिवशी जेवणखाण न करता ती तशीच कॉटवर तळमळत पडली होती. जीवापाड प्रेम करणाऱ्या पतीचं असं विचित्र वागणं पाहून तिला दुःखही झाले आणि आश्चर्यही वाटले. तिला वाटलं, ते येतील तेव्हा विचारावं, 'असा कोणता अपराध, असा कोणता गुन्हा माझ्या हातून घडला की त्याबद्दल अशी शिक्षा देता?'

पण रवी येण्याच्या आत किरणचा वडील भाऊच आला. असं अनपेक्षित आलेल्या माहेरच्या माणसाला पाहून वाहणाऱ्या आसवांना आणखी जास्त पूर आला, पण डोळे तसेच कोरडे करून तिने आपल्या भावाचे आनंदाने स्वागत केले. सायंकाळी रवी परत आला. आलेल्या पाहुण्याशी तो औपचारिकच बोलला. जेवणं झाल्यावर त्यांनी रवीला विचारले,

'किरणला अक्षय तृतीयेसाठी घ्यायला आलो आहे. आपली परवानगी असेल तर ३-४ दिवस...' रवीने त्याचं वाक्य पूर्ण होण्याआधीच किरणने घेऊन जाण्याची अनुमती दिली. दुसऱ्या दिवशी रजा मिळत नसल्याचा बहाणा करून रवी त्या दोघा भावाबहिणीला पोहचवायला सुद्धा न जाता तसाच कॉलेजवर निघून गेला. किरण मनातलं दुःख तशीच घेऊन जड अंतःकरणाने माहेरी निघून गेली.

दोन दिवसांनंतर किरणचं पत्र आलं. त्यात तिने माफी मागून अपराध विचारला होता व शेवटी 'घ्यायला लवकर या' म्हणून मोठ्या नम्रतेनं विनवलं होतं.

रवीने आपल्या पत्नीवर निरातिशय प्रेम केले होते. तिचा स्वच्छंदी, गोड व बोलका स्वभाव त्याला फार आवडायचा, पण तिचं असं वागणं त्याच्या पुरतंच मर्यादित असावं असं त्याला वाटायचं, पण या साऱ्या मर्यादांची लक्ष्मणरेषा तिने ओलांडली होती, हाच तिचा अपराध होता. त्याच्या दृष्टीने तो अक्षम्य अपराध होता. हेच तिच्या पत्राला उत्तर लिहिण्यासाठी तो बसला. टेबलाच्या खणातून लेटरपॅड शोधताना त्याला छोटीशी डायरी दिसली. ती करिणची दैनंदिनी होती. त्यात किरणने आयुष्यातील गमतीदार प्रसंग लिहून ठेवले होते- हे रवीला माहित होते. त्याला ते वाचण्याचा मोह आवरला नाही. त्याने दैनंदिनीची पाने चाळायला सुरूवात केली. त्या दिवशी किरण आपल्याकडे धावत येताना बादलीशी टक्कर होऊन कशी पडली हा प्रसंग वाचून रवीला हसू आवरलेच नाही. परंतु एका क्षणात त्याचं हसू मावळून गेलं. त्या दिवसाचा तो बंगल्यामागील बागेतला प्रसंग त्याला आठवला तशी त्याने संतापाने ती दैनंदिनी फेकून दिली. रात्रभर त्याला झोप आली नाही. पहाटेच काय तो तास दोन तास डोळा लागला असेल. शंकरने त्याला जागे केले व 'चहा आणला' म्हणून सांगितले. रवीने डोळे उघडले तर त्याबरोबर त्याला रात्री संतापाने फेकलेली दैनंदिनी दिसली. अस्ताव्यस्त पडलेल्या त्या दैनंदिनीतून कसले तरी वाळलेले पान डोकावत होती. रवीने दैनंदिनी उचलली व ते पान काढले तो ते केवड्याचे वाळलेले पान खुणेसाठी ठेवलेले होते. दैनंदिनीच्या त्या पानावर किरणने मोठ्या सुंदर अक्षरात खालील मजकूर लिहिलेला होताः

'आजचा दिवस म्हणजे माझ्या आयुष्यातील सर्वात आनंदाचा दिवस! मी शंकरच्या मदतीने बंगल्याच्या मागच्या बागेत केवडा लावला. आता तो किती डवरून गेला- त्याच्या त्या सोनवर्खी पानांनी आणि मंदमधुर सुगंधाने... रवीला केवड्याचा गजरा फार आवडतो. त्यांच्या साठीच तर एवढे परिश्रम घेऊन केवडा लावला, पण शंकरला मी सांगितलं, आत्ता सांगायचं नाही, एकदम आश्चर्यचकित करून सोडायचं! शंकरला गजराही बनवता येतो त्याचा. परवाच्या रविवारी गजरा वेणीत माळून मी एकदम त्यांच्या समोर जाऊन त्यांना आश्चर्यचकित करून सोडणार, पण आज स्वारी जरा रागात दिसते. स्वागत करायला गेले नाही म्हणून तर नसेल? केवड्याच्या धुंदीत मी ते विसरूनच गेले, किती धांदरट मी!'

केवड्याचं ते सुकलेलं पान पुन्हा पुन्हा गालावर, ओठांवर फिरवीत रवी तेच तेच वाचत होता. आणि येणाऱ्या हुंदक्यांना वाट देत होता. शंकर आला तशी त्याने आसवं पुसली.

शंकरने विचारले, ‘साहेब, चहा नाही घेतला अजून?’ त्याच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करून ‘मला केवडा दाखव’ म्हणून जवळजवळ ओढतच रवीने त्याला नेले.

केवड्याचा सुगंधच इतका येत होता की शंकरने तो दाखवण्याच्या आधीच रवीला तो दिसला. पांढऱ्या पिसाऱ्याच्या मोरासारखा केवडा डौलाने उभा होता. त्याच्या सोनेरी पानांतून सुगंधाची उधळण चालली होती. रवी सस्मित होऊन त्याच्याकडे पाहतच होता. सुगंधाने धुंद होत होता जणू काही तो केवड्याचा सुगंध त्याच्याशी लगट करून सांगत होता, किरणचा काहीच अपराध नाही, गुन्हा नाही! आहे ते फक्त प्रेम निव्वळ प्रेम, माझ्यासारखं सुगंधी, पवित्र प्रेम!!

रवीने तसेच कपडे बदलले. शंकरने दुसरा तयार केलेला चहाही न घेता तो तसाच निघाला. शंकरने विचारले, ‘साहेब कोठे निघालात?’

रवी म्हणाला, ‘किरणला घ्यायला!’

आणि भुर्रकन स्कूटर निघून गेली. इतकी वेगात स्कूटर चालवताना रवीला शंकरने कधीच बघितले नव्हते.

तो एक वेळ स्कूटरने उडालेल्या धुळीकडे व एक वेळ केवड्याकडे आश्चर्याने बघतच राहिला!

* * * * *

१५ जून १९७५ साप्ताहिक गावकरी.

कथा – २

# मंगलमूर्ती

वीस वर्षांहून अधिक वर्षे निघून गेली आहेत आणि विस्मृतीचे थरांवर थर साचले आहेत. स्थानिक प्राथमिक शाळेच्या प्रारंभापासून ते जिल्ह्याच्या दुय्यम शाळेपर्यंतच्या माझ्या शिक्षकी पेशाच्या सदतीस वर्षांच्या कारकीर्दीत माझ्या हाताखालून असंख्य विद्यार्थी गेले आहेत. वयाच्या अठ्ठावन्नाव्या वर्षापर्यंत पोहचल्यावर मी आता सेवानिवृत्त झालो आहे. माझं संपूर्ण आयुष्य मुलामुलींना शिकवण्यातच मी खर्च केलं. आता मी थकलो आहे. भूतकाळ पूर्णपणे अंधुक अस्पष्ट झाला आहे. वार्धक्य आणि जगण्याची धडपड यांनी माझं जीवन अधिकच अवघड करून टाकलं आहे.

माझी दोन मुलं- आता मोठी झाली आहेत- आपल्या बायकामुलांबरोबर माझ्यापासून दूर राहत आहेत. आपल्या मिळकतीतून जमाखर्चाची तोंडमिळवणी करता करता त्यांच्या नाकी नऊ येत असल्याने आपल्या वृद्ध पित्याला कोणत्याही प्रकारची मदत करण्याचा त्यांच्या पुढे प्रश्नच उद्भवत नाही. एक शिक्षक म्हणून मला मिळणाऱ्या माफक वेतनातून जी काही थोडीशी पुंजी मी ह्या सदतीस वर्षांत शिल्लक टाकली होती- ती सेवानिवृत्तीनंतरच्या ह्या तीन वर्षांत संपुष्टात आली आहे. आणि शिक्षणखात्यानं अजूनही माझं पेन्शन मंजूर केलं नाही...

फाईल्स ह्या ऑफिसमधून अकाऊंटंट जनरलच्या ऑफिसकडे जातात पुन्हा शंकासमाधानासाठी त्या परत आल्या जातात आणि पुन्हा त्या ए.जी. च्या ऑफिसकडे प्रवास करतात. जेव्हा मी चौकशी करण्यासाठी तिथे जातो तेव्हा मला ह्या टोकापासून त्या टोकापर्यंत पिटाळून लावण्यात येतं. अलिकडे तर मला असे दिसून आले आहे की मी तेथील कारकुनांच्या चेष्टेचा आणि थट्टेचा विषय झालो आहे. त्याबद्दल कुणालाच खेद वा खंत वाटत नाही.

त्या दिवशी सारे तरणोपाय संपल्यावर अगदी जीवावर उदार होऊन मी एक धाडसी प्रयत्न करायचं ठरवलं. पायी रखडत रखडत दोन मैल दूर असलेल्या त्या ऑफिसमध्ये कसाबसा पोहोचलो आणि काही मिनिटं विश्रांती घेण्यासाठी म्हणून तिथल्याच एका बाकावर अंग झोकून दिलं. शेवटी सारं धैर्य एकटवलं आणि एकदाचं त्या हेडक्लार्कला गाठलं.

'सर! आपण कृपया माझ्या पेन्शनची कागदपत्रे साहेबांपुढे ठेवून ह्या प्रकरणाला गती मिळावी अशी साहेबापुढे माझ्या वतीने विनंती कराल का? मी आपले उपकार कधीही विसरणार नाही.'

हेडक्लार्कने तोंड वेडेवाकडे केले.

'तुमची कागदपत्रे राजकोटला गेला आहेत,' त्याने उत्तर दिलं.

'केव्हा परत येतील ती?' मी विचारायचं धाडस केलं.

'ते मला कसं माहित असणार?' टेबलावर पडलेल्या फाईलींचा ढिगारा धुंडाळायचं त्यानं नाटक केलं. 'कदाचित ते...' पण पुढील शोधाशोध लगेच थांबवून तो माझ्याकडे वळला.

'जेव्हा आम्हाला अखेरचा निर्णय कळेल तेव्हा तुम्हाला तसे कळवूच. तरी असं सारखं सारखं दर तिसऱ्या दिवशी असं इथं येत जाऊन आमच्या खनपटीस बसत जाऊ नका.' असं मला दटावून तो इतर कारकुनांबरोबर चहापान आणि थट्टामस्करीत मिसळून गेला.

'कुणास ठाऊक मी तोपर्यंत जिवंत राहतो की नाही ते?' मी स्वतःशीच पुटपुटलो आणि परत जाण्यासाठी वळलो. परंतु स्वयंपाकघरातील ते रिकामं कपाट आणि त्याहूनही अधिक ती रिकामी भांडी माझ्या डोळयांपुढे लोंबकळू लागली आणि मी थांबलो.

'सर! ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसरला वैयक्तिक रित्या भेटण्याची आपण मला परवानगी द्याल का?' मी मोठ्या काकुळतीनं हेडक्लार्कला विचारलं. 'कदाचित ते...'

'काय विचित्र माणूस आहे!...' कपाळाला आठ्या चढवून त्यानं माझ्याकडे पाहिलं आणि मोठ्या तिरस्कारानं तो पुढं म्हणाला, 'शेवटी पंतोजी ते पंतोजीच ना!'

गुजराथमध्ये गरीब साध्याभोळया शिक्षकी पेशातल्या माणसाला 'पंतोजी' ही हास्यास्पद संज्ञा लावली जाते.

मी अवाक् झालो.

'साहेब नुकतेच मागच्या आठवड्यात कामावर रुजू झाले आहेत,' तो पुढे म्हणाला. 'ते फारच कडक असून व्यवस्थितपणा आणि शिस्तीचे भोक्ते आहेत, म्हणून जरा जपून रहा. जर तुम्ही अशी घाईगर्दी केली तर प्रकरण बिघडेल आणि पुढील निर्णय लांबणीवर पडेल. म्हणून तुम्ही त्यांना आणि आम्हालाही त्रास देऊ नये हे बरं.' असं म्हणून त्याने पटकन आपलं डोकं कागदपत्रकात खुपसलं.

मला भोवळ आली, शिपाई बसला होता त्या बाकावर मी कसाबसा बसलो.

काही मिनिटं गेली. सारं काही भयाण आणि उदास दिसत होतं.

तेवढ्यात कोठून तरी एक मांजर आली, तिने आपले डोळे माझ्यावर स्थिर केले आणि केविलवाणेपणाने म्याँव म्याँव केले. शेवटी तिने पटकन उडी मारली आणि आरामात माझ्या शेजारी पडली आणि झोपी गेली.

अगदी अजाणतेपणाने मी तिच्या मखमली शरीराला थोपटू लागलो. गालावरून खाली ओघळू पाहणारे अश्रू मी मोठ्या प्रयासाने मागे आवरले. 'पुढच्या आठवड्यात माझी भाकरी कोठून येईल,' ही समस्या मला भेडसावत होती.

नंतर लगेच एक जीप आली आणि दरवाजाजवळ उभी राहिली. शिपाई आणि इतर लोक उठून उभे राहिले आणि पायऱ्या चढणाऱ्या साहेबाला त्यांनी सलाम ठोकला. मी सुद्धा एका वाऱ्याच्या झोतासारखी पटकन उडी मारली आणि पट्टेवाल्याचं अनुकरण करून यांत्रिकपणे हात वर केला.

मनावर छाप पडेल असा पण प्रेमळ व्यक्तिमत्त्वाचा तो अधिकारी कॅबिनकडे चालत गेला, नंतर थांबला आणि भोवती वळून माझ्यावर एक गोंधळात टाकणारी दयापूर्ण दृष्टी त्याने टाकली. क्षणभर मागेपुढे होऊन शिपायामागून ऑफिसमध्ये तो शिरला.

मी जवळच असलेल्या कारकुनाकडे एक चौकशीपूर्ण कटाक्ष टाकला.

'हे आमचे नवे साहेब आहेत,' एका हितचिंतकासारखी त्याने मला माहिती पुरवली. 'ते अत्यंत कठोर असून कोणत्याही प्रकारचा मूर्खपणा खपवून घेत नाहीत.'

'कडक', 'कठोर', 'शिस्तप्रिय', 'कोणत्याही प्रकारचा मूर्खपणा खपवून घेत नाहीत' ह्या शब्दांनी मी खचून गेलो. मला हेडक्लार्कने दिलेली ताकीद आठवली-

'त्यांच्याजवळ जाऊ नका जपून रहा.'

समंजसपणा हा धैर्याचा एक चांगला भाग आहे. म्हणून मी नशीबावर हवाला ठेवून घाईने माघार घेतली. मी जाण्यासाठी उभा राहिलो.

नंतर लगेच केबिनमधून तो शिपाई बाहेर आला. 'सर! साहेब आपल्याला भेटू इच्छितात.' त्याच्या आवाजात कमालीचा बदल झालेला होता.

'मला?' माझा माझ्या कानांवर विश्वास बसत नव्हता.

'होय, सर.'

मी कोड्यात पडलो, जवळजवळ गोंधळून गेलो. काहीशा भीतीयुक्त अंतःकरणाने कॅबिनमध्ये शिरलो आणि साहेबासमोर उभा राहिलो, माझे हात नमस्कारासाठी वर उंचावले.

'बसा ना, प्लीज' त्याने समोरच्या खुर्चीकडे निर्देश करीत म्हटलं.

मी भीत भीतच बसलो. 'कडक', 'कठोर', 'काळजी घ्या' हे शब्द अजूनही माझ्या कानात घुमत होते.

'आपण येथे कशासाठी आलात हे सांगाल का?' त्याच्या आवाजातील प्रेमळपणाने माझी भीती कुठल्या कुठे पळून गेली.माझ्या प्रकरणाबाबत मी तोडक्या मोडक्या शब्दात सांगायला सुरूवात केली.

'सर! मी एक शिक्षक आहे, आता सेवानिवृत्त झालो आहे. मी तीन वर्षांपासून ह्या ठिकाणी सारखा येरझारा घालीत आहे, पण...' मी अडखळलो.

'बरं...' प्रोत्साहन देत त्याने माझ्याकडे पाहिलं.

‘...पण चक्रे फिरतच नाहीत. माझं पेन्शन प्रकरण अजूनही लोंबकळतच पडलं आहे.’ मी खाली पाहिलं. माझे शब्द मलाच ऐकू येईनासे झाले होते. ‘ह्या कठीण परिस्थितीत माणूस कसा जगू शकेल? सर! तुम्हाला त्याची कल्पना येऊ शकणार नाही...’

साहेबाने जोरात वाजवलेल्या बेलच्या घणघणाटात माझे पुढील शब्द ऐकू येईनासे झाले.

घाईघाईने शिपाई आत आला आणि त्याने साहेबाला सलाम ठोकला.

‘रामजी! जरा ऑफिस सुपरिटेंडना आत बोलावतोस का?’

‘होय, सर!’ अस म्हणून शिपाई परत फिरला.

दुसऱ्याच क्षणाला सुप्रिटेंड आत आले आणि त्यांनी माझ्याकडे एक तिरस्कारयुक्त कटाक्ष टाकला. मला भोवळ आल्यासारखे वाटले.

‘ह्या सद्गृहस्थाच्या पेन्शनचे कागद अजून का तयार झाले नाहीत?’ साहेबाने विचारले.

‘सर हे प्रकरण काहीसं जुनाट आणि गुंतागुंतीचं आहे. ए.जी. च्या ऑफिसने काही प्रश्न उपस्थित केले आहेत त्यांना उत्तर देणं भाग आहे...’

‘...कागदपत्रे परत आलीत का?’ साहेबाने मध्येच विचारले.

‘होय, सर!’

‘मग आजच केस पूर्ण करा.’ साहेब निश्चयाच्या सुरात म्हणाले.

‘पण सर, त्या ठिकाणी खूपच आकडेमोड करावी लागणार आहे;’ सुप्रिटेंड काहीसा चिडून म्हणाला.

‘मग करा ती,’ साहेबाने साधे उत्तर केले.

'आणि, सर, अशा दुसऱ्या सहा केसेस आहेत...' सुप्रिटेंडने आपला वादविवाद पुढे चालू ठेवला होता.

'काही हरकत नाही. आज सायंकाळपर्यंत सर्व पूर्ण करा त्या, आणि पूर्ण झाल्यावर माझ्या सहीसाठी आत पाठवा.'

'होय, सर.' सुप्रिटेंडने भुवया चढवल्या आणि ते जाण्यासाठी वळले. पण त्यांना थांबवलं गेलं.

'आणि आणखी एक गोष्टी मिस्टर मेहता! ह्या सद्‌गृहस्थांच्या प्रकरणास अग्रक्रम द्या, म्हणजे त्यांना जास्त वेळ वाट बघावी लागणार नाही. समजलं?' साहेबांनी शेवट केला.

'होय सर.' माझ्याकडे एक भयंकर दृष्टिक्षेप टाकून ते बाहेर पडले. मी त्यांच्या मागे जाण्यासाठी उभा राहलो, पण मला साहेबाने थांबवलं.

'जाण्यापूर्वी काही मिनिटं आपण मला भेटून जाल का?' त्यांच्या आवाजात कमालीचा प्रेमळपणा होता.

'नक्कीच, सर!'

मी खाली मान घालून बाहेर पडलो. त्या पाच मिनिटांच्या कालावधीत जे काही घडलं त्यानं मी पुरता बावरून गेलो होतो.

सुप्रिटेंडने त्यांच्या क्लार्कला बोलावून माझे केसपेपर्स मागवले आणि साऱ्या ऑफिसात विलक्षण हालचाली सुरू झाल्या. तासाभराच्या आत सारी कागदपत्रे तयार होऊन साहेबांच्या सहीसाठी आत पाठवली गेली. काम पूर्ण झाले होते.

मी सुप्रिटेंडचे, त्याच्या क्लार्कचे आणि शिपायाचे सुद्धा भरपूर आभार मानले, आणि शेवटी जाण्यापूर्वी साहेबाला भेटून जावे म्हणून काहीसे भीतभीतच आत डोकावून पाहिले. मी माझी कृतज्ञता व्यक्त करू इच्छित होतो, त्यासाठी मी योग्य शब्द शोधीत होतो.

त्याने गोड स्मित करून माझं स्वागत केलं. 'आपण मला ओळखलंत का?'

मी टक लावून त्यांच्याकडे पाहिलं, गडबडलो, आणि माझ्या आठवणी चाळू लागलो. शेवटी, मी नकारार्थी मान हलवली. ‘सर! वार्धक्याने माझी स्मरणशक्ती पार बोथट करून टाकली आहे, आणि मी...’ मी चाचपडत होतो.

‘आपले नाव मंगलदास मास्तर आहे पण आम्ही तेव्हा आपल्याला ‘मंगलमूर्ती’ हे टोपणनाव ठेवले होते,’ साहेब बोलत होते.

मी अधिकच गोंधळात पडलो. त्या क्षणाला मला तो ‘कडक’ आणि ‘शिस्तप्रिय’ अधिकारी, ‘कोणत्याही प्रकारचा मूर्खपणा खपवून न घेणारा’ आणि कोणालाही जरब वाटावी असा, खरोखरीचा ‘मंगलमूर्ती’ दिसायला लागला!

‘जेव्हा मी सातव्या इयत्तेत होतो तेव्हा आपल्या विद्यार्थ्यांपैकी एक असण्याचं भाग्य मला लाभलं होतं. दोन वर्षांनंतर आपल्याला प्रमोशन मिळालं म्हणून आपण आम्हाला सोडून लोकल बोर्डाच्या शाळेत गेलात.’ साहेब बोलतच होते.

आणि माझ्या मनाने खोल खोल अशा भूतकाळात बुडी मारली होती. वीस वर्षांपूर्वी ज्या हायस्कूलमध्ये मी शिकवत होतो तेथील असंख्य विद्यार्थ्यांनी मला ‘मंगलमूर्ती’ हे नाव ठेवलं होतं, मूळच्या मंगलदास मास्तर ह्या नावाने मला कुणीच ओळखत नव्हतं.

‘आपल्याला आठवत नाही, सर?’ त्याने प्रेमळपणे विचारलं.

मी पुन्हा नकारार्थी मान हलवली.

‘मग मला आपल्याला आठवण करून द्यायलाच पाहिजे. आमच्या हेडमास्तरांनी एके दिवशी अचानक अशी नोटिस काढली की तीन दिवसांनंतर सर्व विद्यार्थ्यांनी शालेय गणवेशातच वर्गात यावे,’ साहेबाचा आवाज गंभीर झाला होता. ‘चौथ्या दिवशी मी माझ्या नेहमीच्या कपड्यांनिशीच शाळेत गेलो आणि म्हणून मला वर्गात बसायची परवानगी मिळाली नाही. आणि मग...’

त्याच्या शब्दांनी अचानक माझ्या आठवणींची तार छेडली गेली. विस्मृतीत दडलेला तो एक छोटासा प्रसंग माझ्या मनःचक्षुंसमोर तरळू लागला.

२० वर्षांपूर्वीची ती सोमवारची सकाळ होती. मी माझ्या वर्गावर जात होतो तेव्हा एका कोपऱ्यावर एक छोटासा मुलगा मला उभा असलेला दिसला, त्याचे डोळे आसवांनी डबडबलेले होते.

मी त्याच्या जवळ गेलो. ‘काय झालं, बाळ तुला? का रडतोस तू?’

‘मला वर्गातून बाहेर हाकलून लावलं आहे कारण... कारण...’ त्याचे शब्द त्याच्या हुंदक्यात बुडून गेले होते.

मी त्याच्या कोवळ्या खांद्यावर हात ठेवले. ‘का?’

‘... कारण मला शाळेचा गणवेश नाही.’ तो आपले हुंदके दाबीत खाली पाहत होता.

‘मग घेऊन टाक एक. तुझ्या वडिलांना सांग...’

‘सर, काही महिन्यांपासून माझे वडील आजारी आहेत. आमच्यासाठी माझी आई खूप खूप कष्ट करते, आम्हाला पोटभर खायलाही मिळत नाही. आमच्याजवळ पैसे सुद्धा नाहीत तेव्हा...’ त्याला एकदम रडू कोसळले, तो पुढे बोलू शकला नाही.

‘अरे! असं का..’ माझं अंतःकरण भरून आलं. कोसळू पाहणाऱ्या चंद्रमौळी दरिद्री झोपडीतील आजाऱ्याचा बिछाना, तीन जीवांना जगवण्यासाठी धडपडणारी ती स्त्री, एका कोपऱ्यात बसून अभ्यास करीत असलेला किंवा लांब अंतरावरून पाणी आणायला आपल्या आईला मदत करणारा तो एक छोटासा मुलगा, ही सारी दृष्ये जणू काही एखाद्या जादूगाराने माझ्यापुढे उभी केली होती.

एका क्षणाचाही विचार न करता मी त्या मुलाला माझ्या खोलीत नेलं. शालेय गणवेशाच्या एका जोडीची व्यवस्था केली आणि त्याचा अभ्यास पूर्ववत सुरू झाला.

पुढे त्याने सर्व परीक्षांमध्ये वरचा क्रमांक मिळवला. कॉलेजातून उज्ज्वल यश मिळवून पदवीधर झाला, आणि आज तो ह्या डिपार्टमेंटमधील ॲडमिनिस्ट्रेटिव्ह ऑफिसर आहे.

काही वर्षांपूर्वी शालेय गणवेश नसल्यामुळे एका लहानशा मुलाला वर्गाबाहेर हाकलून दिले गेले होते तो प्रसंग एखाद्या स्वप्नासारखा माझ्या मनःचक्षुंपुढून वेगाने सरकत गेला.

मी माझे डोळे उघडले आणि त्याच्याकडे पाहिले 'सर! तुम्ही तोच मुलगा आहात ना की ज्याला मी...'

'होय, मी तोच मुलगा आहे ज्याला आपण एकदा मदत केली होती.' तो मध्येच बोलला. पण आपले 'सर' नाही आपल्यापुढे मी फक्त 'किशोरच' आहे. मी आज जो काही आहे तो आपल्यामुळेच आहे.

मी स्मित करायचा प्रयास केला.

'सर!' तो पुढे बोलला, 'मी आपल्याला मंगलदास मास्तर म्हणून नव्हे तर फक्त 'मंगलमूर्ती' म्हणूनच आजपर्यंत ओळखत आलो आहे. आणि आज सुद्धा आपण माझे २० वर्षांपूर्वीचेच 'मंगलमूर्ती' आहात.'

त्याला उत्तर देण्यासाठी माझ्याजवळ शब्द नव्हते. मी फक्त त्याच्या खांद्यावर हात ठेवला- त्याच भावनेने ज्या भावनेने मी केवळ गणवेश नसल्यामुळे हाकलून लावलेल्या- खेड्यातील शाळेच्या एका कोपऱ्यात हळूहळू हुंदके देत असलेल्या एका बारा वर्षांच्या मुलाच्या खांद्यावर हात ठेवला होता.

आणि ज्यावेळी मी त्या साहेबाच्या ऑफिसमधून बाहेर पडलो तेव्हा मला असं वाटलं की ह्या कचेरीच्या डिपार्टमेंटमध्ये मी माझ्या फसव्या पेन्शनसाठी जी काही तीन वर्षांपासून तीर्थयात्रा करीत होतो ती काही पूर्णपणे वाया गेली नाही.

*मूळ लेखकः दिनानाथ एस. व्यास (गुजराथी लघुकथा)*

*इंग्रजी भाषांतरः परमसुख जे. पंड्याः इंडियन लिटरेचर एप्रिल-जून १९७५ वरून भाषांतरित.*

कथा – ३

# अभिषेक

सूर्याची चाहूल लागताच आकाशातली एकएक तारका नाहीशी होऊ लागली. जणूकाही आकाशातील पारिजातकाचं एक एक फूलच गळून पडत होतं. पानाआड एखादी कळी राहून जावी तशी एखादीच चांदणी दूरवर कुठेतरी लुकलुकताना दिसत होती. हळूहळू तीही नाहीशी होत गेली. सूर्याच्या किरणांनी उरला सुरला सारा अंधार धुवून टाकला. सगळीकडे कसं नितळ स्वच्छ आणि लख्ख ऊन पडलं होतं!

तात्यांनी सुहासला हाक मारली, पण सुहास अजूनही साखरझोपेतच होता, आणि नुसत्या साखरझोपेतच नाही तर त्याला कसलं तरी मधुर स्वप्न पडत असावं, कारण तो जरा नाखुशीनंच उठला.

टॉवेलने तोंड पुसत सुहास बैठकीत आला, तशी त्याची वहिनी मंगल चहा घेऊन आली. सुहासने विचारले, 'वहिनी तात्या कुठे आहेत?'

'ते मघाच ऑफिसात गेले.'

'ऑफिसात?'

'होय! का?'

'पण मग मला हाक कुणी मारली?'

'त्यांनीच! पाचवी हाक होती ती.'

'पाचवी? अरे बापरे! मग?'

'मग काय?' चहा देत मंगल म्हणाली. 'आईंनीच त्यांना म्हटलं की जाऊ द्या, कालच्या प्रवासानं थकला असेल तो, अन् तात्या निघून गेले.'

'अन् आई?' सुहासनं विचारलं.

'त्या मंदिरात गेल्या आणि तुमचे दादाही गेले कामावर-' आणि त्याच्यापुढे बसत जरा चेष्टेनेच ती म्हणाली, 'हं आता सांगा पुण्याची वार्ता!'

'पुण्याची वार्ता?' थोडा विचार करून सुहास म्हणाला.

'होय पुण्याची वार्ता! सांगावीच लागेल. कशी वाटली मुलगी?' मंगलने हसत विचारलं.

'म्हणजे? मुलगी पाहायला मीच एकटा गेलो नव्हतो म्हटलं! तात्या, दादा, आई हे सुद्धा होते. त्यांच्याकडूनच आपल्याला चांगली माहिती मिळेल!' टाळाटाळ करीत सुहास म्हणाला.

'हे पहा भाऊजी टाळाटाळ नका करू. सांगा ना मुलगी आवडली की नाही ते!' मंगल वैतागून म्हणाली.

'हं! हं! एवढा वैताग कशाला वहिनी, सांगतो!'

असं म्हणून सुहासनं चहाचा कप टीपॉयवर ठेवला आणि दूर कुठेतरी स्वप्नात हरवल्यासारखा विचार करू लागला, तशी अधीर होऊन मंगल म्हणाली-

'सांगा ना कशी आहे ती?'

'सांगतो सांगतो!' म्हणून पुन्हा स्वप्नात हरवल्यागत तो बोलू लागला.

'रंग फिका मखमली केतकी

अधर कळी कर्दळी,

छटा जराशी तांबूस गाली

वरी लाजरी खळी!'

हसत हसत मंगल म्हणाली, 'असं? पण कविराज नाव काय हो तिचं?'

पुन्हा तसेच स्वप्नाळू डोळे करून सुहास म्हणाला-

'नाव शालिनी मधुर भाषिणी

मंद हासुनि गाली

मोरपंखी नयनांची जादू

भुलवून मजला गेली!'

हसता हसता मंगलची पुरेवाट झाली, ती म्हणाली, 'एवढे का सुरेख आहेत तिचे डोळे?'

'आता आणखी काय वर्णन करू?'

स्वप्नातून जागा होत सुहास म्हणाला.

'म्हणजे मुलगी पसंत आहे तर स्वारीला!' मंगलने हसत विचारले.

'म्हणजे काय? एकदम शंभर टक्के!' आणि असं म्हणून त्याने मंगलच्या पायावर डोके ठेवले तशी मंगल म्हणाली, 'भावोजी हे काय?'

सुहास म्हणाला, 'सॉरी वहिनी, पुढच्या महिन्याच्या वीस तारखेला आम्ही जोडीने पाया पडू!'

'अय्या! म्हणजे तारीखपण निश्चित झाली!' मंगलने आश्चर्याने विचारलं.

'होय वहिनी, ह्या दीड महिन्यानंतर बेडी पडणार आमच्या पायात,' नाटकीपणे सुहास म्हणाला.

आणि अशा गमतीजमतीत, लग्नाच्या तयारीत एक महिना कोठे निघून गेला पत्ता लागला नाही. सगळीकडे लग्नपत्रिका पाठवल्या गेल्या. बंगल्याची सजावट झाली, आणि एक दिवस अचानक पुण्याहून तार आली. त्या तारेत तात्यांना ताबडतोब बोलावलं होतं. तात्या घाईनं पुण्याला निघून गेले.

दोन दिवसांनंतर तात्या पुण्याहून आले. सारे जण निरनिराळे तर्कवितर्क करीत त्यांचीच वाट पाहत होते. ते आल्याबरोबर सारे जण त्यांच्या भोवती जमले. तात्यांचा चेहरा गंभीर होता. ते घोगऱ्या आवाजात म्हणाले, ‘दादा, सुहास! जेथे जेथे तुम्ही पत्रिका पाठवल्या असतील तेथे तेथे पटकन पत्रे पाठवून द्या- हे लग्न मोडले म्हणून!’ सारे जण आश्चर्याने अवाकच झाले. शेवटी आईनेच धीर करून विचारलं, ‘पण झालं काय ते तर सांगाल?’

तात्या बोलू लागले: ‘चार दिवसांपूर्वी मुलीला मोटारीखाली अपघात झाला. त्यात तिचे डोळे गेले. ती आंधळी झाली. अचानक झालेल्या या अपघाताबद्दल त्यांच्याप्रमाणे मलाही वाईट वाटलं म्हणून काय दुःखाचं ते काळंकुट्ट गाठोडं मी माझ्या मुलाच्या गळयात बांधू? आणि तेही जन्मभर! मी त्यांना स्पष्ट सांगितलं- हे लग्न जमणार नाही.’

‘तुम्ही केलं ते ठीकच केलंत.’ आई म्हणाली.

‘त्यांचं दुर्दैव ते, आपण त्याला काय करणार? राहिली सुहासची गोष्ट. त्याला पुष्कळ मुली सांगून आल्या आहेत!’

सहनशक्ती तुटलेला सुहास एकदम बोलू लागला. ‘नाही तात्या! मी हे लग्न मोडू देणार नाही तुम्हाला! इतकं सगळं ठरल्यानंतर केवळ आपली सोय, आपलं सुख म्हणून तिला ठोकर मारायची? मी असा विश्वासघात करू देणार नाही अन् करणारही नाही. मी लग्न करणार त्या मुलीशीच!’

‘आमचा साऱ्यांचा विरोध असताना?’ तात्या कडाडले.

‘होय,’ सुहास निश्चयाच्या सुरात म्हणाला.

'मग तुला रस्ता मोकळा आहे. आत्ताच्या आत्ता काळं कर तुझं!... ह्या घरातली सारी माणसं मेली आहेत तुझ्यासाठी! जा निघ. एक क्षणभरसुद्धा थांबू नकोस!' तात्या गरजत होते, पण सुहासवर त्याचा काहीही परिणाम होत नव्हता, संथ पावलाने तो निघून गेला. त्याला कुणीही अडवलं नाही. कारण त्याचा अपराधच तेवढा मोठा होता.

पंधरा दिवस झाले सुहास आला नाही. आनंदाने भरलेल्या घरावर दुःखाची अवकळा आली होती.

आणि एक दिवस अचानक सुहास आपल्या अंध वधूला घेऊन आला. तात्या व आई बैठकीतच बसले होते. त्या दोघांना पाहून त्यांचा संताप अनावर झाला. पण तशाही स्थितीत धीर धरून सुहास त्यांच्या पायावर डोकं ठेवण्यासाठी म्हणून खाली वाकला. तात्यांनी पाय एकदम बाजूस केले. रागाने त्यांचं अंग थरथर कापत होतं. संतापाने बेभान होऊन ते गरजले,

'तुला हिम्मत कशी झाली येथे पाय ठेवण्याची? चल चालता हो!' सुहासनं आशाळभूतपणे आईकडे पाहिलं. आंधळ्या सुनेला पाहून आईचे डोळेही लाल झाले होते, तिचा रोख तिच्याकडेच होता. आई म्हणाली,

'अन् तुला नाही का लाज वाटली? तुझे डोळे फुटले तर फुटले, माझ्या भोळ्या भाबड्या पोराचं नशीब फोडायचा काय अधिकार होता तुला? चल निघ येथून, कपाळकरंटी!'

सुहासनं एकदा सगळीकडे पाहिलं. सारी वास्तूच त्याच्यावर उलटलेली त्याला दिसली. शालिनीला आधार देत निराशेने तो घराबाहेर पडला. रस्त्यावरून जाणाऱ्या टांगेवाल्याला त्याने हाक मारली. तेवढ्यात-

'सुहास!'

अशी हाक त्याला ऐकू आली. तापलेल्या फुफाट्यातून मंगल अनवाणीच धावत येत होती. ---'सुहास!' तिच्या शब्दात दुःख होतं, दुर्बलता होती, अगतिकता होती. पदराखाली झाकून आणलेली दह्याची वाटी तिनं बाहेर काढली. आपल्या हातानं दोघा वधूवरांना एकेक चमचा दही तिनं भरवलं. सुहासनं विचारलं, 'वहिनी हे काय?'

ती म्हणाली, ‘दहीसाखर खाल्लेलं माणूस परत येत असतं आपल्या घरी!’ भरलेल्या डोळयांनी सुहासनं तिच्याकडे पाहिलं आणि एकदम दोघांनी तिच्या पायावर डोकं ठेवलं. टांगेवाल्यानं हाक मारली. सुहासनं शालिनीला आधार दिला. दोघंजण टांग्यात बसली. टांगा चालू लागला.

टांगा दूरवर गेला, अदृश्य झाला तरी मंगल अजून दह्याची वाटी घेऊन तशीच उभी होती. तापलेल्या धुळीत त्या अनवाणी पायांवर दोघांची आसवं सांडलेली होती आणि त्या उष्ण आसवांवर मंगलच्या आसवांचा अभिषेक चालला होता!

* * * * *

आकाशवाणी जळगाव केंद्र ३१-७-७८.

कथा - ४

# घासलेटची दुर्गंधी

**-अमृता प्रितम**

बाहेर घोडी खिंकाळली. गुलेरीने ते खिंकाळणे ओळखले आणि ती घराच्या बाहेर पळाली. ती घोडी तिच्या माहेराहून आली होती. तिने घोडीच्या मानेवर आपले डोके ठेवले. जणू काही तो तिच्या माहेरचाच दरवाजा होता.

* * * * * *

गुलेरीचे आईवडील छंबामध्ये राहत असत. ह्या खेड्यापासून तिचे सासर काही मैल अंतरावर उंच ठिकाणी होते, तेथून रस्ता वळण घेत होता आणि टेकडीवरून एकदम खाली उतरत होता. ह्या टोकावरून एखाद्याने पाहिले तर छंबा बरोब्बर त्याच्या पायाखाली खूप दूर असे दिसू शकले असते. जेव्हा जेव्हा गुलेरीला आपल्या माहेरची ओढ लागत असे तेव्हा तेव्हा ती आपला नवरा माणक यास बरोबर घेई आणि ह्या टोकावर चढून जाई. सूर्याच्या प्रकाशात चकाकत असलेली छंबातली घरे ती पाही आणि तो सारा प्रकाश आपल्या हृदयात भरून मोठ्या अभिमानाने खाली उतरत असे.

वर्षातून एकदा, कापण्या वगैरे आटोपल्यानंतर गुलेरीला काही दिवस आपल्या आईवडिलांना भेटून यायची परवानगी मिळत असे. ते तिला छंबाहून परत आणण्यासाठी लाकरमंडीकडे एखाद्या माणसाला पाठवीत. छंबाच्या बाहेर दिलेल्या तिच्या दोन्ही मैत्रिणीही वर्षातनं ह्याच वेळी माहेरी येत. वर्षातून एकदा होणाऱ्या ह्या भेटीची त्या सगळयाच अगदी आतुरतेने वाट पाहत आणि एकमेकींना भेटल्या म्हणजे आपले अनुभव, आपली सुखदुःखे एकमेकींना सांगण्यात कितीतरी घटका घालवीत. रस्त्यांवरून एकत्रित फिरत. नंतर सुगीचा सण येई. त्या सणासाठी त्या साऱ्याजणी नवे कपडे शिवत. रंगविलेले, खळ दिलेले आणि अभ्रकाने चमचमणारे दुपट्टे त्या गळयाभोवती लपेटीत. काचेच्या बांगड्या आणि चांदीचे डूल त्या विकत घेत.

गुलेरी ह्या सुगीच्या दिवसांची नेहमी प्रतीक्षा करी. जेव्हा शरद ऋतूचे मंद वारे पावसाळी ढगांनी भरलेले आकाश स्वच्छ करीत तेव्हा छंबामधल्या आपल्या माहेरच्या घराची तिला आठवण येई. ती आपल्या दैनंदिन कामाकडे वळे- गुरांना चारा वैरण घाली, सासुसासऱ्यांसाठी स्वयंपाक करी आणि मग आपल्याला नेण्यासाठी माहेरून कोण येतंय, केव्हा येतंय याची ती वाट पाहत बसे.

आणि आता पुन्हा एकदा, वर्षातून एकदा माहेरी जाण्याची ती वेळ आली होती. तिने त्या घोडीला मोठ्या आनंदाने कुरवाळले, तिच्या वडिलांनी पाठविलेल्या नोकराचे, नथूचे तिने स्वागत केले आणि दुसऱ्या दिवशी निघायची तयारी केली.

गुलेरी आपल्या मनातील आनंदोर्मी शब्दांतून व्यक्त करीत नव्हती, तिच्या चेहऱ्यावर मात्र त्या पुरेपूर दिसत होत्या. तिच्या नवऱ्याने, माणकने हुक्का जवळ ओढला आणि आपले डोळे मिटले. जणू काही आपल्या बायकोच्या नजरेला नजर भिडवणे त्याच्या जीवावर आले असावे.

“तुम्ही छंबाच्या यात्रेला याल ना? तेवढ्या दिवसापुरते तरी या, याल ना?” ती आर्जवाने म्हणाली.

माणकने आपली चिलीम बाजूला केली परंतु त्याने उत्तर दिले नाही.

“उत्तर नाही दिलंत मला?” गुलेरीने जरा रागातच विचारलं.

“मी काही सांगू का तुला?”

“ठाऊक आहे मला काय सांगणार आहात तुम्ही ते! वर्षातनं एकदाच जाते आहे ना मी माहेरी? बरं यापूर्वी कधीही मनाई केली नाही तुम्ही मग आत्ताच का?” तिनं गाऱ्हाणं मांडलं.

“फक्त एवढ्याच वेळी,” तो अगतिकतेनं म्हणाला.

“सासुबाई तर काहीच बोलल्या नाहीत. मग तुम्हीच का येता माझ्या मार्गात?” गुलेरी जितकी पोरकट तितकीच हट्टीही होती.

“माझी आई ...” माणकने वाक्य पूर्ण केले नाही.

दुसऱ्या दिवशी खूप खूप लवकर अगदी भल्या पहाटेच्याही आधी गुलेरी तयार झाली. तिला पोरं नसल्याने ती बरोबर न्यायची की सासरीच ठेवायची ह्याबद्दल काळजीच नव्हती. सासूसासऱ्यांचा निरोप घेतल्याबरोबर नथूने घोडीवर खोगीर चढविले. त्यानी तिला थोपटले व तिला आशीर्वाद दिला.

"चल मी येतो तुझ्याबरोबर पुढेपर्यंत," माणक म्हणाला.

ते निघाले तेव्हा गुलेरी खूप खूप आनंदात होती. तिने आपल्या दुपट्ट्याखाली माणकची बासरी लपविलेली होती.

खज्जार गावानंतर छंबाकडे जाणारा रस्ता अतिशय उताराचा होता. तिथं गुलेरीने आपल्या दुपट्ट्याखालून बासरी काढली आणि ती माणकजवळ दिली. माणकचा हात आपल्या हातात घेऊन ती म्हणाली, "ए! तुमची बासरी वाजवा ना आता!" पण माणक आपल्याच तंद्रीत होता, त्याने लक्ष दिले नाही.

"का वाजवित नाहीस बासरी?" गुलेरीनं त्याचं मन वळविण्याचा प्रयत्न केला. माणकने तिच्याकडे दुःखपूर्ण दृष्टीने पाहिले. मग आपल्या ओठावर ती बासरी ठेवून आलाप काढले. त्यातून मनोवेदनेचं तीव्र दुःख उमलून गेलं.

"गुलेरी तू जाऊ नकोस गं अशी दूर," त्याने विनवणी केली. "पुन्हा याचना करतो एवढ्या वेळेस जाऊ नकोस गं!" त्याने बासरी तिच्याकडे परत केली, त्याला पुढे बोलवत नव्हतं.

"पण का?" तिने विचारलं. "यात्रेच्या दिवशी या तुम्ही, आपण बरोबरच परत येऊ. मी वचन देते मी मागे मुळीच थांबणार नाही." माणकने पुन्हा विचारलं नाही.

ते रस्त्याच्या कडेला थांबले. त्या दोघा नवराबायकोला एकांत मिळावा म्हणून नथू घोडीला घेऊन चार पावलं पुढं गेला. माणकच्या स्मृती चाळवल्या गेल्या. बरोब्बर सात वर्षांपूर्वी ह्याच वेळी छंबामधल्या सुगीच्या सणाला तो आणि त्याचा मित्र त्याच रस्त्यावरून जात होते. आणि याच यात्रेत त्याने गुलेरीला प्रथम पाहिले आणि त्याच क्षणी त्यांनी एकमेकांना आपली हृदये देऊन टाकली. त्याला आठवलं एकांतातल्या एका नियोजित भेटीत माणकने तिचा हात आपल्या हातात घेऊन सांगितलं होतं, "तू कोवळया दाण्यासारखी आहेस- अगदी दूध भरल्या

कोवळया दाण्यासारखी... पण कोवळया दाण्यांना जनावरांची फार भीती असते.” गुलेरी एक नाजूक झटका देऊन हात सोडवून घेत म्हणाली होती, “माणसंच त्याचा सुंदर हुरडा करतात. जर तुम्हाला मी हवी असेन तर माझ्या वडिलांकडे जा आणि मला मागणी घाला.”

लग्नापूर्वी मुलीची किंमत ठरवणे, अशी प्रथा माणकच्या समाजात होती. गुलेरीचे वडिल गुलेरीची काय किंमत मागतील याची चिंता माणकला पडली होती. पण गुलेरीचे वडील श्रीमंत होते, शहरात राहिलेले होते. आपल्या मुलीच्या मोबदल्यात मी एक पैही घेणार नाही उलट एखाद्या चांगल्या घराण्यातल्या सुयोग्य तरूणाशी तिचे लग्न लावीन असे त्यांनी ठरवले होते. माणकला पाहिल्यावर त्यांच्या साऱ्या अपेक्षा पूर्ण झाल्या आणि नंतर लवकरच माणकशी गुलेरीचा विवाह झाला. आठवणींमध्ये खोल खोल बुडून गेलेला माणक, जेव्हा गुलेरीने त्याच्या खांद्यावर हात ठेवला तेव्हा जागा झाला.

“कुठल्या स्वप्नात होता?” तिने त्याला चिडवलं.

माणकने उत्तर दिले नाही. घोडी उतावळेपणाने खिंकाळली आणि पुढच्या प्रवासाचा विचार करीत जाण्यासाठी म्हणून गुलेरी उभी राहिली.

“येथून दोन मैल अंतरावर एक निळया फुलांचं जंगल आहे, ठाऊक आहे तुम्हाला?” तिनं विचारलं. “असं म्हणतात ह्या जंगलातून कोणी प्रवास केला तर तो बहिरा होतो.”

“होय.”

“मला वाटतं तुम्ही त्या निळया फुलांच्या जंगलात जाऊन आला आहात. कारण मी काय बोलतेय ते कुठं ऐकू येतंय तुम्हाला?”

“खरं आहे गुलेरी, तू काय म्हणतेस ते खरंच ऐकू येत नाही मला.” एक खोल निःश्वास टाकून माणक म्हणाला.

दोघांनी एकमेकांकडे पाहिलं. दोघांनाही एकमेकांच्या मनातलं काही कळलं नाही.

“मी जाईन आता. तुम्ही घरी जा ना आता, किती लांबवर आलात,” गुलेरी हळुवारपणे म्हणाली.

“तू एवढं सगळं अंतर चालून आलीस, थकली असशील ना? बैस बरं घोडीवर,” माणक म्हणाला.

“ही घ्या तुमची बासरी.”

“तुझ्याजवळच असू दे ती!”

“यात्रेच्या दिवशी आल्यावर वाजवाल ना तुम्ही ही बासरी?” गुलेरीने स्मित करीत विचारलं. तिच्या डोळ्यात सूर्य चमकला. माणकने आपले तोंड वळवले. गुलेरीला त्याचं मोठं आश्चर्य वाटलं, तिनं विस्मयाने आपले खांदे उडवले आणि ती छंबाच्या रस्त्याला लागली.

घरात शिरल्याबरोबर तो निरूत्साहाने खाटेवर उताणा पडला.

“केव्हापासनं गेला होतास! थेट छंबापर्यंत तर नव्हतास ना गेला?” त्याच्या आईने विचारलं.

“नाही काही! फक्त टेकडीच्या टोकापर्यंत गेलो होतो.” माणकचा आवाज जड झाला होता.

“एखाद्या म्हाताऱ्या बाईसारखा काय रेकतोस?” त्याच्या आईने कठोरपणे विचारलं. “जरा माणसासारखा वाग!”

माणक उलट उत्तर देणार होता, “तू तर स्त्री आहेस मग तू का असे पुरूषासारखे ओरडतेस?” पण त्याने काहीच उत्तर दिले नाही.

माणक आणि गुलेरीचं लग्न होऊन सात वर्षे उलटून गेली होती. पण तिला अद्याप मूलबाळ झालं नव्हतं. म्हणून माणकच्या आईने एक निश्चय केला होती. ती म्हणायची, “मी ह्या आठव्या वर्षानंतर मुळीच वाट पाहणार नाही.”

ह्या वर्षी तिने अगदी आपल्या निश्चयाप्रमाणे त्याला दुसरी बायको करून आणण्यासाठी ५०० रूपये जमवले होते. आणि गुलेरी तिच्या माहेरी केव्हा जाते याची ती वाटच

पाहत होती. गुलेरी माहेरी गेल्यावर ती त्याला नवी बायको करून आणणार होती. माणकला हे सारे ठाऊक होते.

जनरीत आणि आईची आज्ञा यांना शरण जाऊन माणकच्या शरीराने नव्या स्त्रीशी जुळते घेतले. पण त्याचं हृदय हे आतल्या आत मरून गेलं होतं.

***

एके दिवशी सकाळी सकाळी तो चिलीम ओढत असताना त्याचा एक जुना मित्र त्याला जाताना दिसला.

“ए भवानी, एवढ्या सकाळी सकाळी कुठं निघालास रे?”

भवानी थांबला. त्याच्या खांद्यावर एक छोटेसे गाठोडे होते.

“काही नाही, कुठं नाही,” त्याने उडवाउडवीचे उत्तर दिले.

“कुठेतरी नक्कीच जात असणार,” माणक उद्गारला. “चिलीम पितोस का?” भवानी खाली उकीडवा बसला आणि त्याने माणकच्या हातातून चिलीम घेतली.

“मी छंबाला यात्रेसाठी जात आहे,” तो शेवटी म्हणाला.

भवानीचे शब्द सुईसारखे माणकच्या हृदयात घुसले.

“यात्रा आहे आज?”

“दरवर्षी ह्याच दिवशी असते,” भवानी कोरडेपणाने म्हणाला. “तुला आठवत नाही? बरोब्बर सात वर्षांपूर्वी त्या मेजवानीला गेलो होतो?” भवानी पुढे काहीच बोलला नाही. पण अचानक घडलेल्या ह्या कानउघाडणीमुळे त्याचं चित्त विचलित झालं, तो अस्वस्थ झाला. भवानीने चिलिम ठेवली आणि गाठोडे उचलले. गाठोड्यात खुपसलेली त्याची बांसरी बाहेर दिसत होती. माणकचा निरोप घेऊन तो निघाला. भवानी दिसेनासा होईपर्यंत माणकची दृष्टी त्या बासरीवरून ढळली नाही.

दुसऱ्या दिवशी दुपारी माणक आपल्या शेतात होता, तेव्हा त्याने भवानीला परत येताना पाहिले, पण हेतूपुरस्सर त्याने दुसरीकडे आपली दृष्टी वळवली. भवानीशी बोलायची

त्याची इच्छाही नव्हती किंवा त्याच्या तोंडून यात्रेविषयी त्याला काही ऐकावयाचेही नव्हते. पण भवानी दुसऱ्या बाजूने वळून त्याच्या समोर येऊन बसला. त्याचा चेहरा दुःखी, जळालेल्या कोळशासारखा निस्तेज दिसत होता.

“गुलेरी मेली,” भवानी कोरडेपणाने म्हणाला.

“काय?”

“जेव्हा तिनं तुझ्या दुसऱ्या लग्नाविषयी ऐकलं, तेव्हा तिनं आपल्या कपड्यांवर रॉकेल ओतून पेटवून घेतलं स्वतःला.”

माणक, दुःखाने मुका झाला. दूर कोठेतरी टक लावून बघू लागला. त्याला आपलं सगळं जीवन जळून खाक झाल्यागत वाटत होतं.

***

दिवसांमागून दिवस गेले. माणक नेहमीप्रमाणे पुन्हा त्याच्या शेतात काम करू लागला. त्याला कुणी जेवायला वाढलं तरच तो जेवी. पण तो एखाद्या मेलेल्या माणसागत झाला. त्याचा चेहरा भकास झाला. दृष्टी शून्य झाली.

“मी काही बायको आहे ह्या माणसाची? नुसतं लग्न लावून आणलंय मला.” त्याच्या दुसऱ्या बायकोने तक्रार केली.

पण लवकरच ती गरोदर राहिली आणि माणकची आई आपल्या नव्या सुनेवर अधिकच खूश झाली. तिने माणकला तिच्या अवस्थेबद्दल सांगितलं. पण त्याने तिच्याकडे असे काही चमत्कारिक पाहिले की जणूकाही त्याला काही कळलेच नाही. त्याचे डोळे शून्य झाले होते.

त्याच्या आईने तिच्या सुनेला केवळ थोड्या दिवसांसाठी तिच्या नवऱ्याचे असे वागणे सहन करायला सांगितले. जेव्हा तुला मूल होईल आणि जेव्हा ते त्याच्या मांडीवर खेळेल तेव्हा आपसूक वठणीवर येईल असे त्याची आई म्हणाली.

माणकच्या बायकोला मुलगा झाला, आणि त्याच्या आईने त्याला मोठ्या आनंदाने न्हाऊमाखू घातले. त्याला सुरेख कपडे घातले आणि माणकच्या मांडीवर ठेवले. नुकत्याच जन्मलेल्या त्या अर्भकाकडे माणक नुसता टक लावून पाहू लागला. कितीतरी वेळ तो तसे टक लावून पाहत होता. त्याचा चेहरा नेहमीप्रमाणे अनाकलनीय आणि भावशून्य दिसत होता. नंतर

अचानक ते शून्य डोळे भीतीने भरून गेले आणि माणक जोरात ओरडू लागला. “उचला याला, दूर न्या याला!” तो वेड लागल्यासारखा आणि कर्कश आवाजात ओरडला, “दूर न्या त्याला. घासलेटची दुर्गंधी येते त्याला!”

*(Translated from Punjabi by Khushwant Singh)*

*(FRAGRANT FLOWERS P.145. Tr. 7/5/83)*

## कथा – ५

# प्रेमाची कला

एक हजार वर्षांपूर्वी काबुसाच्या मध्यपूर्वेकडील शहरात एक अविसेना नावाचा प्रमुख शास्त्रज्ञ आणि वैद्य रहात होता. एके दिवशी बादशहाकडून त्याला राजवाड्यात हजर राहण्याचे फर्मान आले. राजाच्या आवडत्या पुतण्यास भयंकर आजाराने जखडले होते. राजाच्या पदरी असलेल्या मोठमोठ्या वैद्यांनी अनेक उपचार केले पण काही उपयोग झाला नाही. अविसेनाने त्याची नाडी तपासली आणि मग तो म्हणाला, “ज्या माणसाला या शहराची पूर्ण माहिती आहे अशा माणसाला बोलवा.” तसा माणूस शोधून काढून बोलवण्यात आला आणि वैद्याच्या सांगण्यावरून त्याने काबुसाच्या रस्त्यांची आणि चौकांची नावे घेण्यास सुरूवात केली. एका रस्त्याचे नाव निघताच त्याची नाडी जोरात चालायला लागली. अविसेनाने नंतर त्या गल्लीत राहणाऱ्यांची नावे सांगायला सांगितले. त्यात एका मुलीच्या नावाचा उल्लेख करताच त्या तरूणाची नाडी पुन्हा जलद झाली. अविसेना म्हणाला, “हा मुलगा प्रेमात पडला आहे. त्याला सर्वोत्तम औषध म्हणजे त्या मुलीशी याचे लग्न करून देणे हे होय. अन्यथा निराशा आणि दुःखाने हा मृत्यू पावेल.” बादशहाला दुसरा पर्यायच नव्हता. त्याने लग्नाचा दिवस जाहिर केला. जेव्हा त्या तरूणाला हे कळले तेव्हा तो झपाट्याने बरा झाला. हे ऐकून त्या राजवैद्यालाही आश्चर्य वाटले.

खरोखर अनंत सुखांचा वर्षाव करण्याची दिव्य शक्ती प्रेमातच असू शकते आणि हेच प्रेम कधी कधी अतीव दुःखाच्या खाईतही लोटू शकते. ही संमिश्र आणि परस्पर विरोधी भावना आहे. किंबहुना हे दोन ध्रुवांचे संमेलन आहे. एकीकडे विश्वास, दृढभक्ती, अगाध प्रेमभावना, एकत्रित राहण्याचा आनंद आणि दुसरीकडे स्वार्थ, अविश्वास, प्रमाद, वैफल्य आणि हृद्यशून्यता.

ह्या विसंवादांची सुरूवात प्रेमाच्या ह्या “दुहेरी दृष्टीशास्त्रा” बरोबर होत असते. प्रेमात पडलेली व्यक्ती त्याच्या उत्कट भावनेच्या गोष्टींकडे गुलाबी चष्म्याने पाहते आणि असे पाहताना गुणच तेवढे पाहिले जातात, अवगुण मात्र क्वचितच अवलोकिले जातात. परिणामतः आपण आपल्या कल्पनेत जी व्यक्ती चितारलेली असते ती—आणि ज्या व्यक्तीवर आपण प्रेम करतो ती यात बऱ्याच वेळा तफावत असते. अगदी त्याच वेळी प्रेमाला जे सूक्ष्मदृष्टीत्व लाभलेलं असतं ते दुसऱ्या कोणत्याच भावनेला लाभलेलं नसतं. प्रियकर आपल्या प्रेयसीच्या आत्म्याच्या अगाधतेचा आणि प्रकृतीच्या ... शोध घेतो ज्याची नंतर कधीच अभिलाषा केली जात नाही.

प्रेम करणे म्हणजे जाणणे, अत्यंत प्रिय व्यक्ती होणे म्हणजे जाणले जाणे. म्हणूनच यात संशय नाही की प्रेम करणारे नेहमी विस्मित होत असतात, विशेषतः तरूण मुलीः किती अंतर्यामी आहे तो, माझ्या अव्यक्त, अस्पष्ट अभिलाषांची अटकळ तो बांधतो, मला काय म्हणायचे असते हे तो अंतर्ज्ञानाने जाणतो. कदाचित, ही दुसऱ्यांच्या संवेदना आणि भावना जाणण्याची प्रेमाची अलौकिक अंतर्दृष्टी असावी.

वैवाहिक प्रेम हे फक्त विरळच नाही तर अल्पकालिक असते, असे एक मत मोठ्या प्रमाणावर प्रचलित आहे, कारण पती आणि पत्नी तत्काळ एकमेकांशी जुळते घेतात आणि म्हणूनच परस्परातील आकर्षण आणि आस्था गमावतात. एक सुप्रसिद्ध रशियन लेखक अलेक्झांडर हेरझेनने लिहिले आहे, “विवाहाशिवाय एकाच छपराखाली राहणे हे मूळतःच भयावह आहे, त्यामुळे सर्व ऐक्यांचा अर्धाअधिक नाश होतो. निकटच्या सानिध्यात राहिल्याने लोक अधिक भ्रष्ट चरित्र बनतात, अतिशय संकुचित बनतात, गूढ बनतात. काव्य आणि सौंदर्याबरोबर व्यक्तिमत्त्वाभोवती गुंफलेल्या हारातील फुले पाकळी पाकळीने तोडली जातात.”

वैवाहिक प्रेमाला प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष असे अनेक शत्रू असतात. ह्या सर्वात विश्वासघातकी म्हणजे भावनांचा ऱ्हास होऊन त्याचे परिवर्तन आचरणात होणे. उदाहरणार्थ एका किंवा दुसऱ्या जोडीदाराचं देखणेपण ज्याचं नुकतंच आकर्षण निर्माण झालं आहे- ते पती किंवा पत्नीचे डोळे दिपवणारं जरी असलं तरी दीर्घकाळपर्यंत त्या आकर्षणाची जाणीव टिकत नाही.

तथापि अस्सल प्रेम नसतानाच जेव्हा लोक लग्न करतात तेव्हाच प्रायः भावनांचं हे अधःपतन आपली जागा घेतं. जर अकृत्रिम खोल भावना अस्तित्वात आल्या तर काही वर्षांनंतरही त्यांचा ऱ्हास होत नाही अगर त्यांची कलंकित लाजिरवाणी अवस्था होत नाही. त्याऐवजी त्यांचे

अव्यक्त स्वरूपात स्नेहात रूपांतर होते. आणि त्याच स्नेहाचं हे सातत्य अधिक निश्चल, अधिक चिरंतन असतं.

म्हणूनच प्रेमात विशेषतः वैवाहिक प्रेमात एकमेकांना आकर्षित करण्याची शक्ती असणं, एकमेकांविषयी काहीतरी नवीन जाणून घेण्याची दृष्टी असणं अत्यंत महत्त्वाचं असतं. तरच तुम्ही ज्यावर प्रेम करता त्याला चित्ताकर्षक वाटाल.

एका पुराणकथेप्रमाणे ईव्ह ही ॲडमची पहिली बायको नव्हती. प्रथमतः निर्मात्याने त्याच्यासाठी अग्निपासून एक लावण्यवती लिलिथ बनवली. परंतु ज्यापासून ॲडम बनवला गेला होता त्या मातीचा वास तिला तिरस्करणीय वाटल्यामुळे ती त्याला सोडून गेली. आणि मग ॲडमला उद्विग्न झालेले पाहून परमेश्वराने त्याला अनुरूप अशी सहचारिणी देण्याचे ठरवले. ॲडमला झोपवून त्याने त्याची एक बरगडी काढली आणि तिच्यापासून त्याने ईव्ह बनवली (म्हणजे एकाच पदार्थापासून!) आणि ही पत्नी 'एकाच्या मांसाचे मांस आणि हाडाचे हाड' (एकाच हाडामांसाची) घेऊन आलेली ईव्ह ही ॲडमची सच्चरित्र सहचारिणी झाली.

ही दंतकथा, विवाहाचे सामर्थ्य हे दोन अनुरूप व्यक्तिमत्त्वांवर अवलंबून असते ह्या प्राचीन कल्पनेला पुष्टी देते, आज यालाच मानसशास्त्रीय अनुरूपता म्हणतात. 'आत्मैक्याचा अभाव' हीच कुटुंबातील संघर्षाची मुख्य कारणे होत.

रशियन लोकांमध्ये एक म्हण आहेः प्रेम करणे म्हणजे एकमेकांकडे टक लावून पाहणे नव्हे तर एकाच आणि अभिन्न दिशेकडे पाहणे होय, कारण खरे प्रेम हे वैषयिक आकर्षणापर्यंतच मर्यादित नसते.

तथापि अनुरूपतेचा अर्थ व्यक्ती व्यक्तीतील बेमालूम सांधेजोड असा समजला जाऊ नये. जीवनातल्या आकांक्षांतील सहभाग, मूल्यांच्या जाणिवेतील सहभाग, सर्वसामान्य सांस्कृतिक पातळी ह्या महत्त्वाच्या गोष्टी होत. दोन अहंमन्य व्यक्तींमध्ये सहानुभाव संभवनीय नसतोच, प्रत्येकजण तो किंवा ती आपल्या स्वार्थासाठी, मागणी हक्कांसाठी व लाभासाठी भांडेल. जर उभय पतीपत्नीमध्ये नेतृत्वाची स्पष्ट लक्षणे असतील तर संघर्ष अटळ राहील. दोघेही अग्रक्रमासाठी झटत राहतील आणि कुणीही नम्रतेने माघार घेणार नाही. त्यागशील आणि कृपण, मनमोकळे आणि अंतर्मुख ह्या साऱ्यांनाच दुःखाला तोंड देणे संभवनीय असते.

एखादी व्यक्ती स्पष्टपणे, जी अनुरूप नसेल अशा व्यक्तीच्या प्रेमात पडू शकते. पण एखादी व्यक्ती फक्त आपल्या अनुरूप सहचराबरोबरच आपलं प्रेम अबाधित ठेवू शकते. अनुरूप

दंपती एकमेकांच्या अपेक्षा नेहमीच अबाधित ठेवत असतात. काही विशिष्ट निर्णयावरील मतभेद आणि मतभेद उद्भवण्याचे क्षण यांची पूर्णपणे शक्यता असते, परंतु जोपर्यंत प्रेम, स्नेह आणि परस्परांच्या इच्छा ह्या लग्नविधीचे संवर्धन करतात तोपर्यंत ह्या मतभेदांना वाव नसतो.

अशी एक चित्ताकर्षक आणि जवळजवळ विस्मृत झालेली पौराणिक कथा आहे की फार फार वर्षांपूर्वी मानवजात आजच्या पेक्षा भिन्न होती. तेव्हा ना पुरूष होते ना स्त्रिया, आणि म्हणून वैवाहिक संघर्षही नव्हता किंवा समस्याही नव्हत्या. तेव्हा द्विलिंगी (दोन्ही लिंगांचा संयोग असलेले) लोक ह्या पृथ्वीवर वास्तव्य करीत होते. ते कल्पनातीत सुंदर, बुद्धिमान आणि दयाळू होते. तसेच ते अतिशय बलवानही होते आणि दिवसेंदिवस ते अधिक सामर्थ्यशाली बनत चालले होते. एका सुंदर दिवशी जिझसचे लक्ष ह्या द्विलिंगींवर गेले आणि त्याला अशी भीती वाटली की एक ना एक दिवस हे लोक आपलं सिंहासन बळकावतील. म्हणून त्याने त्यांना उभे चिरून त्यांचे दोन भाग केले, एकत्र मिसळले आणि त्यांना पृथ्वीच्या पृष्ठभागावर सगळीकडे विखरून दिले.

आणि म्हणून आपल्या हरवलेल्या अर्ध्या भागाचा शोध घेणं हा मानवाचा स्थायीभाव झाला. काही वेळा एक दुसऱ्याच्या पूर्ण जीवनाचा शोध घेऊ पाहतो आणि काही वेळा एकाला दुसरा अर्धा भाग सापडत नाही, पण दुसऱ्याच कुणाचातरी अर्धा भाग त्याच्या हाती लागलेला असतो.

कथा – ६

# खोपा

सकाळची वेळ. वसंतराव बाहेरून येणाऱ्या वत्रमानपत्राची आणि स्वयंपाकघरातून येणाऱ्या चहाची वाट बघत व्हरांड्यात आरामखुर्चीवर रेललेले असतात. अचानक त्यांचा डोळा लागतो. तेवढ्यात कविताबाई चहा घेऊन येतात. त्या म्हणतात,

“अहो झोपलात की काय? उठा चहा घ्या.”

“अगं कवडे मला एक खूप सुंदर स्वप्न पडत होतं.”

“एवढ्या दोनतीन मिनिटात?”

“अगं हो ना! पण ते स्वप्न नव्हतंच मुळी. बालपणीच्या सुंदर दिवसातली कोवळी आठवण होती.”

“काय बाई मेलं म्हातारपणातही तुम्हाला अशी स्वप्ने पडतात... घ्या हा चहा.” (कविताबाई त्यांच्यापुढे टीपॉयवर चहा ठेवतात आणि परत जायला लागतात. वसंतराव तिचे हात धरतात.)

“अगं थोडं बैस ना माझ्यापाशी- बैस अशी माझ्यापाशी... रूप तुझं छान गं! चंद्रावाणी मुखडा तुझा रंग गोरापान गं!!”

“फक्त रंग गोरापान, बाकी चंद्रावाणी वगैरे काही राहिलं नाही. सुरकुत्या येताहेत गालावर— सोडा मला, स्वयंपाकघरात कामं पडली आहेत खूप.”

“अगं तसं नाही. तोच चंद्रमा नभात, तीच चैत्रयामिनी, एकांती मज समीप असता तीच तूही कामिनी...”

“पुढचं सगळं गीत ठाऊक आहे मला आणि मी म्हणते कशाला ह्या वाळल्या फुलात व्यर्थ गंध शोधता?”

“अगं पण हे वाळलं फूल म्हणजे त्या अप्रतिम सुगंधाचं सुंदर ताज्या रंगांचं घरच होतं ना?”

“बरं ते जाऊ द्या. तुम्हाला त्या दोन-तीन मिनिटात काय स्वप्न पडलं होतं ते तरी सांगा.”

“अरे हो विसरलोच की, स्वप्न कसलं गोड गोजिरवाणी आठवणच म्हण ना!”

“मी चारपाच वर्षांचा असेन, माझ्या छोट्याशा गावात उन्हाळ्याचे दिवस संपल्यानंतर मृगाचा पाऊस पडतो. मग आम्ही सारी भावंडं बाहेर पळत येतो. पावसाची पुन्हा एक सर येते आणि थांबून पुन्हा ऊन पडते. पहिला पाऊस... मातीला असा काही सुगंध सुटला होता की काही विचारू नकोस. कुठल्याही अत्तराशी त्याची तुलना होणार नाही असा. माती थोडी ओली थोडी सुकी. मग आम्ही साऱ्यांनी काय केलं म्हणून विचार.”

“सांगा काय केलं ते?”

“प्रत्येकाने आपला उजवा पाय पुढे केला आणि त्याच्यावर ती ओलीसुकी माती भरली. ती पायांवर दोन्ही हातांनी थोपटली आणि अलवारपणे पाय बाजूला काढून घेतले. त्याचे छोटे छोटे खोपे तयार झाले. ज्यांचे पाय मोठे त्यांचे खोपे मोठे. ज्यांचे पाय छोटे त्यांचे खोपे छोटे.”

(त्याच्या डोळयात पाणी तरळतं.)

“अहो काय झालं? म्हणूनच मला तुमच्या कुठल्याही गोष्टी ऐकाव्याशा वाटत नाहीत. सांगता सांगताच तुम्ही रडायला लागता.”

डोळे पुसत, “पुढे ऐक ना!”

“सांगा! पण न रडता, टिपूस न गाळता!”

“अगं माझी ही आसवं म्हणजे वठत चाललेल्या झाडाची पिकली पानं. ती गळायला इवलीशी आठवणही पुरेशी होते. शेक्सपिअरने तर एके ठिकाणी म्हटलं आहे की एखादं झाड भयंकर वादळातही ताठ्यानं दीर्घकाळ तोऱ्यात उभं असतं पण एखादी झुळूक अशी येते की ते क्षणात कोलमडून पडतं.”

“पण मी म्हणते अशा आठवणींची लागवड करून त्यांना किती दिवस खतपाणी घालायचं, मोठं करायचं आणि त्यांना कवटाळून रडत बसायचं?”

अर्धवट स्वतःशीच, “बहिणींचं जाऊ दे एक वेळ, लग्न होऊन त्या सासरी गेल्या पण माझे भाऊ? साऱ्यांनी आपला आपला खोपा बनवला. दूर... दूर एकमेकांपासून... आपल्यापासून.....”

“आता मला एक सांगा, एकाच इवल्याशा खोप्यात सारी पिलं मोठी झाल्यावर आपला गोतावळा घेऊन कशी राहतील? चिमण्या, कावळे, आणिकही काही पक्षी- यांची घरटी कशी असतात? एक एक काडी जमवून आपल्या अंगच्या कौशल्यानं, बुद्धीनं, कुवतीनं, सोयीनं निवारा, सुरक्षितता पाहून आपल्या पिलांना त्यात जन्म देतात. पिलं बिचारी चोची वासून आई आणीत असलेल्या घासाची वाट बघतात. आई रानोमाळ हिंडून आणून त्यांना घास भरवते. ती मोठी होतात, आई त्यांना आकाशात उडायला शिकवते. एकदा का ती उडती झाली की दूर... दू....र कुठल्या कुठे उडून जातात. कालांतराने आईलाही विसरून जातात. ज्या घरट्यात त्यांचं पालनपोषण होतं.. ज्या घरट्यात त्यांना आईची माया मिळते त्या घरट्यालाही ते विसरून जातात.... तेव्हा त्या आईला याचे दुःख वाटत नसेल?”

“बघा, पुन्हा तुमचे डोळे भरून आले. मला हेच आवडत नाही.”

“तुला ते आवडत नाही आणि मला तरी आवडतं का?”

“मग काय हा वेडेपणा? हे बघा जे ते ज्यांच्या त्यांच्या खोप्यांमध्ये सुखी आहेत, आनंदात आहेत. मग आपण आपल्या खोप्यामध्ये सुखी का राहू नये? आपल्या दोघांचा दोघांनी बनवलेला, श्रम करून काड्या काड्या जमवून केलेल्या खोप्यात शांतपणे राहणं किती छान नाही? ‘कुणी घर देतं का घर?’ असं म्हणायची वेळ तर आली नाही ना आपल्यावर? आभाळ भरून आलं, वादळ सुटायला लागलं. पाऊस येईल आता.... ओलं व्हायच्या आत चला बरं! ते अश्रू पुसा आणि चला आपल्या खोप्यात.”

* * * * *

कथा – ७

# थॉमस

Kjell Askildsen

मी आता भयंकर म्हातारा होत चाललो आहे. लिहिणं तसंच चालणे जवळ जवळ दुरापास्तच झाले आहे. मी खूपच मंदगती आहे. एका दिवसातून मी फक्त मोजकीच वाक्ये तयार करू शकतो. आणि थोड्या दिवसांपूर्वी मी मूर्छित पडलो होतो. म्हणून मला कळून चुकलं होतं की शेवट जवळ आला आहे. त्यावेळी मी बुद्धीबळाच्या समस्येवर काम करीत होतो. अचानक आलेली कमजोरी माझ्या लक्षात आली. मला अशी जाणीव झाली की जीवन स्वतःच क्षीण होत आहे. ते क्लेशकारक नव्हते. फक्त थोडंसं अप्रिय होतं. आणि मग पुन्हा मूर्छित व्हायलाच हवं होतं, कारण बुद्धिबळाच्या पटावरील माझ्या डोक्यासह मी जागा झालो होतो. दोघे राजे आणि प्यादे उलटे सुलटे झालेले होते. अगदी तसंच मला मृत्यूमुखी पडायचं होतं. पण वेदनेशिवाय मृत्यू असं विचारणंही अती आहे. जर मी आजारी असतो, अतीवेदनेसह आणि वाटलं असतं की आजारपण आणि वेदना ह्या वास्तव्यालाच आल्या आहेत, जो मला शून्यतेत मदत करील असा एखादा मित्र असणं किती छान. पण जसं आपल्याला ठाऊक आहे की ह्याला कायद्याची बंदी आहे. दुर्दैवाने कायदे नेमस्त असतात. आणि म्हणून डॉक्टर्ससुद्धा वेदना पुढे ढकलतात, काही आशा उरलेली नाही असे ठाऊक असूनही. ह्याला वैद्यकीय नीतितत्वे म्हणतात. पण कुणीच हसत नाहीये. नियमानुसार वेदनेतील लोक हसत नसतात. जग काहीच दया दाखवित नाही. मी असं ऐकलं आहे की सोव्हिएत संघाने, ज्यांना फाशीची शिक्षा सुनावली होती त्यांना मागून गोळ्या घालून ठार मारण्यात आले, जे कैदेत फाशीच्या शिक्षेची प्रतीक्षा करीत होते. अगदी पूर्वसूचना न देता अचानक. क्षुद्रतेतील मानवतेचा स्पर्श जणू त्यांना दाखवला होता. पण जगाने निषेध केलाः कमीत कमी गोळ्या घालणाऱ्या त्या तुकडीच्या समोरासमोर त्यांना मृत्यूमुखी पडायला परवानगी द्यायला हवी होती. धार्मिक मानवतावादाला उपेक्षावादाचा अधिक सूर आहे, हो ठीक सामान्यतः मानवतावादात.

पण मी माझ्या डोक्यासह जागा झालो. त्या बुद्धीबळातल्या माणसांमध्ये. नाहीतर ते बहुधा सर्वसामान्य झोपेतून जागे होण्यासारखे झाले असते. मला थोडंसं गोंधळल्यासारखं झालं.

काही चांगलं माहित नसताना मी ते तुकडे पुन्हा व्यवस्थित ठेवले. पण मी ती समस्या सोडवण्यात माझं लक्ष केंद्रित करू शकण्यात समर्थ ठरू शकलो नाही. मग दारावरची बेल वाजली, मी त्याला उत्तर दिले नाही, मी विचार केला. तो बहुधा ख्रिस्ती धर्मोपदेशक असावा ज्याची अशी इच्छा असावी की मी शाश्वत जीवनावर विश्वास ठेवावा. अलिकडे ते असंख्य झाले आहेत. अंधश्रद्धा खूपच वाढली आहे असं वाटतं. पण बेल पुन्हा एकदा वाजली, आणि मला संशय आला. काहीही झालं तरीही ते एकदाच बेल वाजवतात. म्हणून मी म्हणालो “थोडं थांबा” आणि दरवाजा उघडण्यासाठी गेलो. त्याला काही वेळ लागला. तो मुलगा होता. तो स्थानिक शाळेच्या वाद्यवृंदासाठी पैसे उभारण्याकरीता तिकीटे विकत होता. ती बक्षिसे जुन्यांच्या आंतरराष्ट्रीय नसलेल्या जुन्यांच्या टवाळयांची होती. दुचाकी, पाठीवरची पिशवी, फुटबॉल खेळातील बूट आणि तसंच काही. पण मला नकार दर्शवायची इच्छा नव्हती म्हणून मी तिकीट विकत घेतले. जरी मला बँड संगीत आवडत नसले तरी. मी पैशाचे पाकीट कपाटाच्या कप्प्यावर ठेवले, म्हणजे जेणेकरून त्याला आत बोलवता आले असते. नाहीतर त्याला बराच वेळ वाट पाहावी लागली असती. तो माझ्या मागून चालत आला. तो बहुधा त्याच्या आयुष्यात इतका सावकाश कधीच चालला नसेल. आमच्या ह्या मार्गात तू कोणतं वाद्य वाजवतोस असा प्रश्न विचारत मी वेळ घालवला. “ओ, मला नाही माहित,” तो म्हणाला. ते विक्षिप्त उत्तर होते, असं मला वाटलं, पण मी असं गृहीत धरलं की तो लाजाळू होता. मी त्याचा आजोबा असणं शक्य होतं. कदाचित मी असावा. मला माहित आहे, मला अनेक पणतू आहेत, पण त्यापैकी मला कुणीही ठाऊक नाहीत. “तुमचे पाय खूपच दुखतात का?” तो म्हणाला. “ओ, नाही, ते भयंकर म्हातारे झाले आहेत,” मी उत्तरलो. “ओ, मग ठीक आहे तर,” त्याने वरपांगी दिलासा दिला. आम्ही कपाटाच्या कप्प्यापर्यंत पोहोचलो आणि त्याला पैसे मिळाले. मग मला भावविवशतेचा झटका आलेला होता. मला वाटलं त्याला एक तिकीट विकायला विनाकारण इतका वेळ लागला म्हणून मग मी अजून एक तिकीट विकत घेतले. “तुम्ही असं करायला नको,” तो म्हणाला. अगदी त्याच क्षणी मला भयंकर भोवळ आली. घर हवेत तरंगायला लागलं. मला कपाटाच्या कप्प्यांना धरायचे होते. माझे पैशाचे उघडे पाकीट मी गमावले, जमिनीवर. “खुर्ची,” मी म्हणालो. जेव्हा मला ती मिळाली तेव्हा त्या मुलाने साऱ्या जमिनीवर विखुरलेली नाणी गोळा करायला सुरूवात केली. “आभारी आहे तुझा पोरा,” मी म्हणालो. “हरकत नाही,” तो उत्तरला. त्याने ते पैशाचे पाकीट कपाटाच्या कप्प्यावर ठेवले. तो गंभीरपणे माझ्याकडे पाहून म्हणाला, तुम्ही कधी बाहेर जाऊच शकत नाही का? मग मला

उमजून आले की मी बहुधा अखेरचेच बाहेर जाऊन आलो होतो. मी रस्त्याच्या बाजूला मूर्छित पडण्याचा धोका पत्करायचे धाडस करीत नाही. त्याचा अर्थ असा असेल की दवाखाना किंवा वृद्धाश्रम. "ह्यापेक्षा अधिक काही नव्हे," मी म्हणालो. "ओ," तो म्हणाला. आणि ते तो अशा रितीने म्हणाला की मला पुन्हा भावविवशतेचा झटका आला. मी मूर्ख म्हातारा झालो आहे. "काय बरं तुझं नाव?" मी विचारलं आणि उत्तराने फक्त वाईट बनवलं. "थॉमस," अर्थातच मी त्याला सांगणारच नव्हतो की माझंही नाव तुझ्यासारखंच आहे म्हणून, पण मी अशा काही विचित्र गंभीर अवस्थेत होतो. ठीक, यात काही आश्चर्य नाही. अखेरीस मला नुकताच घंटानाद ऐकू आला- म्हणण्या जोगा. म्हणून अकस्मात माझ्या डोक्यात आलं की त्या मुलाला काहीतरी द्यावे जेणेकरून त्याला माझी आठवण राहील. ओ, मला ठाऊक आहे, मला ठाऊक आहे, पण मी स्वतः पूर्णपणे काहीच नव्हतो. म्हणून मी त्याला सांगितलं की पुस्तकाच्या पेटीवर उभे असलेले जुने कोरलेले घुबड खाली काढ. "ते तुझ्यासाठी," मी म्हणालो, "ते माझ्यापेक्षाही जुनाट आहे." "ओ नाही," तो म्हणाला. "का? अरे माझ्या पोरा, फक्त हे, हे. तुझ्या मदतीबद्दल आभारी आहे. आणि कृपया तू गेल्यावर धाडकन दरवाजा बंद कर."

"खूप आभारी आहे तुमचा," मी त्याला निरोपदर्शक मान हलवली. मग तो गेला. तो आनंदी दिसत होता. पण कदाचित तो ढोंग करीत असावा.

तेव्हापासून मला भयंकर भोवळ आणि चक्करही आली. पण मी खुर्ची घेतलेली होती, मला धोक्याचे मुद्दे मिळाले. घर खिन्न आणि गोंधळलेले झाले होते. कुणीच राहत नसल्याचा जवळ जवळ भास होत होता. पण मी अजूनही येथे जिवंत आहे- जिवंत आणि प्रतीक्षा करणारा.

Translated short story- Vasant Bagul

Original author- Kjell Askildsen- Thomas F's siste nedtegnelser til Imenheten

Short Stories, Oslo, 1983, Aschenhoug ISB 82-03- 11260-9

the magazine Norwagian Literature The Horseman Special Issue No. 4/5 September 1992

Published in corporation with NORLA and NFF.

कथा – ८

# सोनेरी मासा

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक म्हातारा आणि एक म्हातारी होती. ते समुद्रकिनाऱ्यावर एका मोडक्या तोडक्या झोपडीत राहत असत. दररोज तो म्हातारा मासे पकडण्यासाठी समुद्रकिनाऱ्यावर जात असे. एके दिवशी त्याने आपले जाळे पाण्यात फेकले आणि ते परत ओढले, तेव्हा त्याला दिसले की फक्त एकच मासा त्याच्या जाळ्यात अडकला आहे. परंतु तो सामान्य मासा नव्हता – तो एक सोनेरी मासा होता. तो मासा लगेच मानवी आवाजात आणि विनवणीच्या सुरात बोलू लागला,

“मला जाऊ दे, हे वृद्ध माणसा, मी तुझ्या सर्व इच्छा पूर्ण करीन!”

त्या म्हाताऱ्याने त्या सोनेरी माशाला परत समुद्रात फेकून दिले, पण त्या बदल्यात त्याने काहीही मागितले नाही. नंतर तो घरी गेला आणि ह्या जादूच्या माशाबद्दल त्याने म्हातारीला सांगितले.

ती खूप संतापली.

“अरे कुचकामी मूर्ख म्हातारड्या! तू कमीत कमी एक नवी झोपडी तरी मागू शकत होतास. आपली झोपडी सगळी पडायला आली आहे! जा परत समुद्रावर आणि बोलव तुझ्या माशाला!”

तो म्हातारा समुद्रकिनारी गेला आणि बऱ्याच वेळपर्यंत सोनेरी माशाला त्याने हाका मारल्या. शेवटी तो मासा पोहत वर आला आणि त्याने विचारले,

“हे माझ्या प्राणदात्या, मी तुझी काय सेवा करू शकतो?”

“म्हातारीने मला तुझ्याकडे पाठवले आणि म्हणाली की मी एक नवी झोपडी मागावी. आमची झोपडी बऱ्याच वर्षांपासून पडायला आली आहे.”

“घरी जा. नव्या झोपडीपेक्षाही तुला अधिक मिळेल, जा, तुला एक छोटंसं सुंदर घर मिळेल.”

म्हातारा घरी गेला आणि त्याला आपल्या जुन्या झोपडीच्या जागी ओक वृक्षाच्या लाकडाचं कोरीवकाम असलेलं असं सुशोभित घर दिसलं. म्हातारी अंगणातच उभी होती. आणि पूर्वीपेक्षा अधिक संतापलेली होती.

“नवी झोपडी मिळाली आणि खूष झालास! तू संपत्ती का मागितली नाहीस? परत जा तुझ्या माशाकडे आणि सांग त्याला की तुला एक साधा शेतकरी होऊन रहायचं नाही. तुला पाहिल्याबरोबर लोकांनी सलाम केले पाहिजे इतका श्रीमंत माणूस तू व्हायला हवास.”

म्हातारा समुद्रकिनारी गेला आणि त्याने पुन्हा त्या सोनेरी माशाला हाक मारली. “दुःख करू नकोस,” म्हाताऱ्याची विनवणी ऐकून तो मासा म्हणाला. “म्हातारीची इच्छा असेल तसेच होईल.”

तो म्हातारा घरी गेला आणि घराच्या जागी एक दगडी इमारत आणि अंगणात नोकर चाकरांची धावपळ होत असलेली त्याला दिसली. म्हातारी खुर्चीत बसली होती. तिने जरीचे किमती कपडे घातलेले होते आणि ती नोकरांना हुकूम सोडीत होती.

“आता झालं तुझं समाधान?” त्याने तिला विचारलं.

परंतु अशा दरिद्री आणि उर्मट माणसाने आपल्याजवळ यायचं धाडस केलं म्हणून तिने त्या दिशेने नुसता एक दृष्टिक्षेप टाकला आणि त्याला फाटकाच्या बाहेर फेकून देण्याचा हुकूम रक्षकाला सोडला.

नंतर तिला त्याची दया आली, आणि तिने त्याला एक नोकर म्हणून ठेऊन घेतला. त्याला एक झाडू दिला गेला आणि नोकरांच्या बरोबर त्याची खाण्यापिण्याची सोय केली गेली.

काही काळ गेला आणि नुसती श्रीमंत स्त्री होऊन रहायचा तिला कंटाळा आला. तिने त्या म्हाताऱ्याला बोलावले आणि हुकूम सोडला.

“जा त्या सोनेरी माशाला शोध आणि त्याला सांग मला महाराणी व्हायचे आहे. जा पळ लवकर!”

तो म्हातारा परत समुद्राकडे गेला. समुद्राच्या लाटा किनाऱ्यावर जोरजोरात आदळत होत्या त्यात त्याचा आवाज बुडून गेला. शेवटी तो सोनेरी मासा प्रकट झाला.

“आता काय पाहिजे तुला?” त्याने विचारले.

“म्हातारी आता पूर्वीपेक्षाही जास्त वाईट वागायला लागली आहे. तिला आता फक्त श्रीमंत स्त्री होऊन रहायचा कंटाळा आला आहे. आता तिला महाराणी व्हावेसे वाटते.”

“निराश होऊ नकोस. मी ह्या वेळीही तुला मदत करीन.”

आता तर समुद्रकिनाऱ्यावरूनच त्या म्हाताऱ्याला दगडी घराच्या जागी सोनेरी छपराचा उंच राजवाडा दिसू शकत होता. बंदूकधारी पहारेकरी मुख्य दरवाजाच्या समोर गस्त घालीत होते. म्हाताऱ्याने आत प्रवेश केला. परंतु त्याने त्या म्हातारीला ओळखले नाही. तिने राजेशाही पोषाख केला होता. त्याच्याकडे पाहण्याचीही तिची इच्छा नव्हती. उंची मखमलीच्या गणवेशातील नोकर तिच्यापुढे वाकून उभे होते. राजवाड्यात दररोज नृत्य, गाणे बजावणे यांचे जलसे होत होते.

असाच काही काळ गेल्यावर म्हातारीला महाराणीपदाचा आणि राजवाड्याचाही कंटाळा आला. तिने आपल्या सेवकांना म्हाताऱ्याला शोधून तात्काळ समोर हजर करण्याचा हुकूम सोडला. राजवाड्यात खरोखर खळबळ उडाली. तो म्हातारा दिसायला कसा आहे हेही ते दरबारी साफ विसरून गेले होते. शोधाशोध करून शेवटी राजवाड्याच्या पाठीमागे कुठेतरी तो सापडला. त्यांनी त्याला महाराणीपुढे हजर केले. ती म्हणाली,

“तुझ्या त्या सोनेरी माशाकडे लगेच जा आणि सांग की आता मी फार काळ महाराणी म्हणून राहू शकत नाही. मला सागरसम्राज्ञी व्हावेसे वाटते. कारण मग तो जादूचा मासाही माझ्या सेवेत राहील.”

हे शब्द ऐकून त्या म्हाताऱ्याच्या हातापायांना कापरे भरले. पण तो त्या महाराणीची आज्ञा उल्लंघू शकत नव्हता. तो मोठ्या दुःखाने समुद्रकिनारी गेला आणि त्याने

सोनेरी माशाला बोलवायला सुरूवात केली. समुद्र अंधारून गेला आणि अवाढव्य लाटा किनाऱ्यावर आदळू लागल्या.

"तू इतका दुःखी का?"

"तुला कसं सांगावं हेच मला समजत नाही." तो उत्तरला. "म्हातारी अतिलोभाच्या पूर्णपणे आहारी गेली आहे. तिला आता महाराणीपद नको आहे. आणि ती आता सागरसम्राज्ञी होऊ इच्छिते. तिला साऱ्या माशांवर राज्य करायचे आहे. तू सुद्धा तिच्या चाकरीत असावा अशी तिची तीव्र इच्छा आहे."

त्या सोनेरी माशाने म्हाताऱ्याचे म्हणणे ऐकून घेतले पण उत्तर दिले नाही. मग तो वळला आणि अथांग पाण्यात नाहीसा झाला.

म्हातारा घरी आला तेव्हा त्याच्या डोळयांवर त्याचा विश्वास बसेना. महाराणीचा राजवाडा नाहीसा होऊन त्या ठिकाणी त्यांची मोडकी तोडकी झोपडी उभी होती. म्हातारी जुन्या पुराण्या व फाटक्या कपड्यांत पायरीवर बसली होती आणि ती रडत होती.

ते पुन्हा पूर्वीसारखे रहायला लागले. तो म्हातारा पुन्हा मासे पकडण्यासाठी समुद्रावर जाऊ लागला. पण त्या म्हाताऱ्याच्या जाळयात पुन्हा कधीच तो सोनेरी मासा अडकला नाही.

*The Golden Fish*
*A Russian Fairy Tale*
*Sputnik*
*Digest of the Soviet press*
*November 1983 p. 141*
\- *वरून भाषांतरित*
*दि. २६ जानेवारी १९८४.*

कथा – ९

# रम्पेल स्टिल्ट्स-कीन

एकदा कोणा एका राज्यात एक गरीब गिरणीवाला राहत होता. ज्याला अतिशय सुंदर अशी एक मुलगी होती. याशिवाय ती अतिशय चतुर आणि हुशारही होती. आणि तो गिरणीवाला इतका गर्विष्ठ आणि बढाईखोर होता की एके दिवशी त्याने त्या देशातील राजाला सांगितले की त्याची मुलगी कडब्यापासून सोने कातू शकते. आता त्या राजाला पैशाचे खूपच वेड होते आणि जेव्हा त्याने त्या गिरणीवाल्याची बढाई ऐकली तेव्हा त्याचा हावरटपणा अधिकच उद्दीप्त झाला आणि त्याने त्या मुलीला त्याच्या समोर आणण्याची आज्ञा केली. नंतर त्याने तिला एका मोठ्या खोलीत नेले जेथे मोठ्या प्रमाणावर कडबा होता. त्याने तिला एक चरखा दिला आणि म्हटले, “जर तुला तुझ्या जीवाची पर्वा असेल तर सकाळ होण्याच्या आत हे सर्व सोन्यात कातून झालेच पाहिजे.”

तिने तिच्या निष्ठुर दुर्दैवावर रडायला सुरूवात केली. त्याच वेळी अकस्मात दरवाजा उघडला आणि चमत्कारिक दिसणारा एक बुटका माणूस लंगडत आत आला आणि म्हणाला, “नमस्कार, माझ्या गोड पोरी, तू का बरं रडत आहेस?” “हाय!” तिने उत्तर दिले, “मला हा कडबा सोन्यात कातायलाच हवा. आणि मला माहित नाही हे कसे करायचे.” “मला काय देशील तू,” तो छोटा माणूस म्हणाला, “तुझ्यासाठी हे करण्याबद्दल?” “माझ्या गळयातील रत्नहार,” त्या युवतीने उत्तर दिले. त्याने तिच्या शब्दावर विश्वास ठेवला आणि स्वतः त्या चरख्याजवळ बसला, गोल गोल फिरत, भराभर, हसत खेळत सोने कातण्याचे काम केले गेले होते.

जेव्हा राजा आला आणि त्याने हे पाहिले तेव्हा तो खूप आश्चर्यचकित आणि हर्षभरित झाला, पण त्याचे मन अजूनही अधिक लोभी झाले आणि त्या गिरणावाल्याच्या मुलीला कोंडून देऊन पुन्हा नव्या कामाला जुंपले. मग काय करावे तिला सुचेना आणि पुन्हा एकदा खाली बसून ती रडायला लागली, पण इतक्यात त्या बुटक्याने दरवाजा उघडला आणि म्हणाला, काय देशील तू मला ह्या तुझ्या कामाबद्दल? “माझ्या बोटातली अंगठी,” तिने उत्तर दिले. म्हणून तिच्या

छोट्या मित्राने अंगठी घेतली आणि त्याने चरख्याजवळ बसून कामाला सुरूवात केली आणि सकाळ होईपर्यंत सर्व काम पूर्ण केले.

राजा तो झळाळणारा खजिना पाहून पुन्हा खूप खूष झाला, पण अजूनही त्याचे समाधान झाले नव्हते. त्याने त्या गिरणीवाल्याच्या मुलीला एका प्रशस्त खोलीत नेले आणि म्हटले, "ह्या रात्रीत हे सर्व कातून व्हायला हवे, आणि जर तू ह्या कामात यशस्वी झालीस तर तू माझी राणी होशील." ज्या वेळी ती एकटी होती त्या वेळी तो खुजा आत आला आणि म्हणाला, आता ह्या तिसऱ्या वेळी जर मी तुला सोने कातून दिले तर तू मला काय देणार? "माझ्या जवळ काहीच शिल्लक राहिले नाही," ती म्हणाली. "मग मला असं वचन दे," तो छोटा माणूस म्हणाला, "तू राणी झाल्यानंतर तुझे पहिले मूल मला देशील," 'ते कधीच होऊ शकणार नाही,' त्या गिरणीवाल्याच्या मुलीने विचार केला. पण तिला ठाऊक होते की हे काम व्हायला दुसरा कुठलाच मार्ग नव्हता तेव्हा त्याने जे मागितले ते त्याला द्यायचे तिने वचन दिले आणि त्याने पुन्हा तो सोन्याचा ढिगारा कातून दिला.

राजा सकाळी तेथे आला आणि त्याला जे काही हवे होते ते सर्व पाहून त्याने तिच्याशी विवाह केला. आणि म्हणून त्या गिरणीवाल्याची मुलगी खरोखर राणी झाली.

पहिल्या छोट्या मुलाच्या जन्माच्या वेळी राणीला खूप आनंद झाला आणि ती त्या बुटक्या माणसाला आणि तिने त्याला दिलेल्या वचनाला विसरून गेली, पण एके दिवशी तो तिच्या अंतःपुरात आला आणि त्याने तिला त्या वचनाचे स्मरण करून दिले, आणि तो म्हणाला, "मी तुला तीन दिवसांची मुदत देतो. त्या दरम्यानच्या काळात तू मला माझे नाव सांगितलेस तर तू तुझे मूल जवळ ठेवू शकतेस."

आता ती राणी जागीच राहिली, चित्रविचित्र नावांचा विचार करीत जी तिने कधीही ऐकलेली नव्हती, आणि नवे नाव शोधायला तिने देशभर सर्वत्र तिचे दूत पाठवले. दुसऱ्या दिवशी तो बुटका माणूस आला, आणि तिने टिमोथी, बेंजामिन, जेरेमिह् आणि जेवढी तिला आठवली तेवढी सर्व नावे तिने घेतली, पण ते सर्व ऐकून तो म्हणाला, "ते काही माझे नाव नव्हे."

दुसऱ्या दिवशी तिने जी हास्योत्पादक नावे- फेंगडे पाय, कुबड्या, वाकड्या आणि इत्यादी इत्यादी- अशी अनेक नावे घेतली, पण तो बुटका सद्‌गृहस्थ त्या पैकी प्रत्येकाला म्हणाला, "ते माझे नाव नव्हे."

तिसऱ्या दिवशी त्या दूतांपैकी एक दूत परत आला आणि म्हणाला, “मी दुसरे कोणतेच नाव ऐकू शकलो नाही. पण काल जंगलातील झाडींमधल्या टेकडीवर मी चढत होतो तेव्हा मी कोल्हा आणि सशाला एकमेकांना शुभरात्रीचा निरोप देताना बघितले, मी एक छोटी झोपडी बघितली, आणि त्या झोपडी समोर एक शेकोटी पेटवलेली होती, आणि त्या शेकोटी भोवती एक विचित्र माणूस एका पायावर नाचत गाणे म्हणत होताः

हसत खिदळत मी करीन मेजवानी
आज मी बनवणार उद्या भाजणार
हसत खिदळत मी नाचेन गाईन गाणी
रम्पेल स्टिल्ट्स- कीन माझे नाव राहणार
खेळ खेळता येणार ना माझ्या बाईला,
कारण दुसऱ्या दिवशी परका ते आणणार!”

जेव्हा राणीने हे ऐकले तेव्हा तिने आनंदाने उडीच मारली, आणि जेव्हा तो बुटका पाहुणा तिच्याकडे आला आणि म्हणाला, आता बाई, सांगा माझे नाव काय?

“जॉन आहे का?” “नाही!”

“टॉम आहे?” “नाही!”

“तुमचे नाव रम्पेल स्टिल्ट्स-कीन असू शकते का?”

“कुणीतरी चेटकीणीने तुम्हाला सांगितले असावे ते!” तो बुटका माणूस किंचाळला आणि रागाने त्याने त्याचा उजवा पाय जमिनीत खुपसला तो त्याने दोन्ही हातांनी काढण्याचा प्रयत्न केला.

नंतर तो घाईने- शक्य होईल तेवढ्या घाईने निसटण्याचा प्रयत्न करू लागला, आणि सर्व जण त्याला त्याच्या व्यर्थ कष्टाबद्दल आणि त्याच्या विचित्र नावाबद्दल हसू लागले.

कथा – १०

# चिन- चिन कोबाकामा

जपानी घरांमधील तक्तपोशी सुंदर दाट मुलायम गवताच्या काड्यांपासून विणलेल्या चटईने आच्छादित केलेली असते. त्या चटया एकमेकांत इतक्या सूक्ष्मतेने एकवटून घट्ट बसवलेल्या असतात की केवळ चाकूचे पातेच त्यात तुम्ही सरकवू शकाल. त्या वर्षातून एकदा बदलल्या जातात, आणि अतिशय स्वच्छ ठेवल्या जातात. जपानी लोक कधीच घरात पादत्राणे घालत नसतात, आणि ते खूर्ची किंवा फर्निचर वापरत नाहीत जसे इंग्लिश लोक वापरतात. ते बसतात, झोपतात, जेवण करतात आणि कधी कधी लिखाणही करतात पण ते फक्त भुईवर. म्हणूनच ह्या चटया त्यांना अतिशय स्वचछ ठेवणे खरोखर गरजेचे असते, आणि जपानी लहान मुले जेव्हा थोडी मोठी होऊन बोलायला लागात तेव्हा त्यांना ह्या चटया कधीही खराब किंवा घाणेरड्या करायच्या नाहीत अशी शिकवण दिली जाते.

हल्लीची जपानी मुले खरोखरच खूप छान आहेत. सारे प्रवासी, ज्यांनी ज्यांनी जपानबाबत पुस्तके लिहिली आहेत, त्यांनी ठामपणे म्हटले आहे की जपानी मुले ही इंग्लिश मुलांपेक्षा अधिक आज्ञाधारक आणि खूपच कमी खोडकर असतात. ते कुठल्याही वस्तू खराब किंवा घाणेरड्या करीत नाहीत, आणि एवढंच नव्हे तर ते स्वतःची खेळणीही कधी तोडत मोडत नाहीत. एखादी लहान जपानी मुलगी तिची बाहुली कधीच तोडत मोडत नाही. नाही, ती तिची खूप काळजी घेते आणि मोठी स्त्री होऊन लग्न होईपर्यंत ती तिला जपून ठेवते. जेव्हा ती आई होते, आणि तिला मुलगी होते तेव्हा आपल्या लहानशा मुलीला ती बाहुली देते. आणि आईने घेतली अगदी तशीच काळजी ती त्या बाहुलीची घेते, ती स्वतः मोठी होईपर्यंत आणि शेवटी आपल्या स्वतःच्या मुलांना देते, आणि ती मुलंही तिच्याशी छान खेळतात, तशीच जशी त्यांची आजी तिच्याशी खेळली होती. म्हणून मी, जो ही छोटीशी गोष्ट तुमच्यासाठी लिहित आहे, मी पाहिल्या आहेत त्या जपानमध्ये, शंभर वर्षांपेक्षाही अधिक जुन्या बाहुल्या पण त्या नव्या असताना जितक्या सुरेख दिसायच्या तशाच. ह्याच्यावरून तुम्हाला कळेल की जपानी मुलं किती छान असतात; आणि तुम्ही समजू शकाल की जपानी घरातल्या खोल्यांतील तक्तपोशी जवळ जवळ किती स्वच्छ ठेवल्या जातात,- अगदी खोडकर खेळातही ओरखडे न पाडलेल्या आणि खराब न केलेल्या.

तुम्ही मला विचाराल की खरंच सर्व, सर्वच्या सर्व जपानी मुलं इतकी चांगली असतात? ठीक- नाही, काही थोडी अगदी थोडीशीच मुले खोड्या करणारी असतात. आणि काय होतं मग ह्या खोडकर मुलांच्या घरातल्या चटयांचं? खूप वाईट नाही- कारण तिथे पऱ्या असतात ज्या त्या चटयांची काळजी घेतात. ह्या पऱ्या थट्टा करतात आणि भेडसावतात त्या मुलांना जे त्या चटया खराब आणि घाणेरड्या करतात. कमीत कमी त्या त्यांची थट्टा करतात आणि त्या खट्याळ मुलांना भिववतात तरी. मला अजूनतरी पूर्णपणे निश्चित असं सांगता येणार नाही की त्या लहान लहान पऱ्या अजूनही जपान मध्ये अस्तित्वात आहेत की नाहीत,- कारण नव्या आगगाड्यांचे जाळे आणि तारायंत्रांचे खांब ह्यांनी पऱ्यांना खूप मोठ्या प्रमाणावर घाबरवून पळवून लावले आहे. पण त्यांच्या विषयी येथे एक लहानशी गोष्ट आहे.

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. एक अतिशय सुंदर मुलगी होती, पण ती खूप आळशी सुद्धा होती. तिचे आईवडील खूप श्रीमंत होते आणि त्यांच्या जवळ भरपूर नोकर चाकर होते, आणि ह्या नोकर-चाकरांना ती खूप आवडायची, आणि ज्या गोष्टी ती स्वतः करू शकत होती त्या सर्व गोष्टी तिच्यासाठी ते नोकर-चाकर करायचे. कदाचित ह्यामुळेच ती आळशी झाली होती. जेव्हा ती मोठी होऊन एका लावण्यवती स्त्रीत तिचे रूपांतर झाले तेव्हाही ती आळशीच राहिली, पण ते नोकर चाकर तिला सजवायचे आणि तिची केशरचना करून द्यायचे तेव्हा ती इतकी मोहक दिसायची की तिच्यात दोष आहे असं कुणालाही वाटत नसे.

अखेरीस तिचं एका शूर योध्याशी लग्न झालं, आणि ती त्याच्या बरोबर दुसऱ्या घरी त्याच्याबरोबर रहायला निघून गेली जेथे मोजकेच नोकर चाकर होते. आपल्या घरी जसे नोकर-चाकर होते त्या पेक्षा येथे अतिशय कमी नोकर-चाकर आहेत हे पाहून ती खिन्न झाली, कारण इतर लोक तिच्यासाठी नेहमी ज्या गोष्टी करीत त्या तिला आता स्वतःलाच करणे भाग पडू लागले. स्वतःच पोषाख घालणे आणि स्वतःच्या कपड्यांची काळजी घेणे, स्वतःला नीटनेटके आणि जेणेकरून आपला नवरा प्रसन्न राहील असं स्वतःला आकर्षक ठेवणे ह्या साऱ्या गोष्टी तिला खूप त्रासदायक वाटू लागल्या. पण तो योद्धा असल्यामुळे त्याला घरापासून दूर लष्कराबरोबर जावे लागे, त्यामुळे तिला आपल्या मनासारखं आळशी राहता यायचं. तिच्या नवऱ्याचे आईवडील खूप म्हातारे होते आणि ते स्वभावाने खूप चांगले असून तिच्यावर ते कधीच रागावत नसत.

बरं, एके रात्री तिचा नवरा लष्कराबरोबर लांब गेलेला असताना, तिला तिच्या खोलीत येणाऱ्या हलक्याशा गोंगाटाने जाग आली. कागदाच्या कंदिलाच्या प्रकाशात ती छान बघू शकत होती, आणि तिला एक विचित्र गोष्ट दिसली. काय?

शेकडो छोटी छोटी माणसे, जपानी योद्ध्यांसारखा पोषाख घातलेली, पण केवळ एक इंच उंचीची, सारी तिच्या उशीभोवती नाचत होती. तिचा नवरा सुट्टीच्या दिवसात जसा पोषाख परिधान करायचा त्याच प्रकारचे पोषाख त्यांना घातलेले होते (कामिशिमो- चौकोनी खांदे असलेला लांब झगा) त्यांनी केसांना गाठी मारलेल्या होत्या, आणि प्रत्येकाने दोन छोट्या छोट्या तलवारी बाळगलेल्या होत्या. ते सारे तिच्याकडे बघून हसत होते, नाचत होते आणि पुन्हा पुन्हा तेच तेच गाणं म्हणत होते.

"चिन-चिन कोबाकामा

योमो फुके सोरो, ओशिझुमारे, हिमे-गिमि

या तोन तोन!"

ज्याचा अर्थः आम्ही आहोत चिन चिन कोबाकामा, फार फार उशीर झाला, झोपा, सन्माननीय उमराव जान!

ते शब्द खूप सुशील वाटत होते, पण तिला लगेच दिसले की ती लहान माणसं तिची क्रूर चेष्टा करीत आहेत. ते तिच्याकडे कुरूप चेहरे करून बघत होते. तिने त्यांना पकडायचा प्रयत्न केला पण ते इतक्या चपळतेने उड्या मारीत होते की त्यांना पकडणं तिला शक्य झालं नाही. मग तिने त्यांना दूर हाकलून देण्याचा प्रयत्न केला, पण ते गेले नाहीत, आणि त्यांनी त्यांचं 'चिन चिन कोबाकामा' हे गाणं गायचं थांबवलं नाही आणि तिच्याकडे पाहून हसतच ते गाणं म्हणत होते. नंतर तिला कळले की त्या छोट्या छोट्या पऱ्या होत्या, आणि ती इतकी घाबरली होती की तिला रडू सुद्धा फुटत नव्हते. सकाळपर्यंत ते तिच्या भोवती नाचत होते, नंतर एकाएकी ते सारे नाहीसे झाले.

काय घडलं ह्याबद्दल कुणालाही सांगायला तिला लाज वाटत होती- कारण ती एका योद्ध्याची पत्नी होती आणि तिची इच्छा होती की ती किती घाबरली होती हे कुणालाही कळता कामा नये.

दुसऱ्या दिवशी रात्री, पुन्हा ती सारी छोटी छोटी माणसं आली आणि नाचली आणि ती त्यानंतरच्या रात्री सुद्धा आली, आणि प्रत्येक रात्री- अगदी नेहमीच्या वेळेप्रमाणे ज्या वेळेला, ज्याला जुने जपानी लोक 'वृषभघटिका' म्हणायचे त्या वेळी म्हणजे आपल्या पहाटे दोन वाजेच्या सुमारास. अखेर झोप न मिळाल्यामुळे आणि भीतीपोटी ती खूप आजारी पडली. पण त्या छोट्या छोट्या माणसांनी काही तिचा पिच्छा सोडला नाही आणि तिला एकटं सोडलं नाही.

जेव्हा तिचा नवरा घरी परत आला, तेव्हा आपल्या आजारी बायकोला बिछान्यावर पडलेले पाहून त्याला खूप दुःख झाले. सुरवातीला ती कशानं आजारी झाली ह्याचं कारण सांगायला तिला भीती वाटली, आणि असंही वाटलं की आपलं ऐकून ते आपल्याला हसतील. पण तो खूप प्रेमळ होता, त्याने तिला हलकेच कुरवाळले, त्यानंतर थोड्याच वेळात प्रत्येक रात्री काय काय घडलं हे तिने त्याला सांगितले.

तो हसला नाही, पण काही क्षण विचारपूर्वक पाहू लागला. मग त्याने विचारले,

“कोणत्या वेळी येतात ते?”

ती उत्तरली, “नेहमी त्याच वेळी-”

“ठीक आहे,” तिचा नवरा म्हणाला, “आज रात्री मी स्वतःला लपवून घेऊन त्यांच्यावर लक्ष ठेवतो. घाबरू नकोस.”

म्हणून त्या रात्री त्या योद्ध्याने स्वतःला झोपायच्या खोलीतल्या कपाटाआड लपवून घेतले आणि सरकदरवाज्याच्या फटीमधून तो बघू लागला.

तो वृषभघटिका येण्याची वाट पाहत पाळत ठेवू लागला. नंतर अचानक, ती छोटी माणसे चटईमधून बाहेर आली, आणि त्यांचं नाचगाणं त्यांनी सुरू केलं-

“चिन-चिन कोबाकामा

योमो फुके सोरो...”

ते इतके विचित्र दिसत होते आणि विक्षिप्तपणे नाचत होते की त्या योद्ध्याला आपले हसू दाबून ठेवावे लागले. पण त्याने त्याच्या तरूण पत्नीचा भेदरलेला चेहरा पाहिला आणि त्याला अचानक आठवले की जपानी भुते आणि पिशाच्च हे तलवारीला घाबरतात, त्याने तलवार उपसली आणि तो कपाटामागून येऊन त्यांच्यावर चालून आला आणि त्या छोट्या नर्तकांवर वार केला. तेव्हा तात्काळ त्या सर्वांचे रूपांतर झाले— काय वाटतंय तुम्हाला”

दात कोरण्याच्या काड्यांत!

तेथे आता ते छोटे योद्धे नव्हते- फक्त खूप जुनी दातकोरणी इतस्ततः त्या चटईवर पसरलेली होती. ती तरूण पत्नी इतकी आळशी होती की वापरलेले दातकोरणे ती व्यवस्थित टाकीत नसे, तर प्रत्येक दिवशी ते दातकोरणे वापरल्यानंतर फेकून देण्याऐवजी बसल्या जागीच चटईखाली कोंबून द्यायची. म्हणून त्या छोट्या पऱ्या ज्या त्या तक्तपोशीवरील चटयांची काळजी घ्यायच्या त्यांना तिच्या अशा वागण्याचा राग आला, आणि म्हणून त्यांनी तिचा छळ केला.

तिचा नवरा तिच्यावर खूप रागावला आणि तिला ह्या गोष्टीची खूप लाज वाटली की काय करावं हेच तिला कळेना. नोकरांना बोलावण्यात आलं, आणि त्या सगळ्या दातकोरण्या गोळा करण्यात आल्या आणि जाळून टाकण्यात आल्या. त्यानंतर ती छोटी माणसं कधीच परत आली नाहीत.

आळशी मुलीबाबत अजून एक गोष्ट आहे, जी आलुबुखार खायची आणि नंतर त्यातल्या बिया काढून बसल्या जागी तक्तपोशीच्या वरील चटईखाली आळशीपणे ठेवून द्यायची. खूप दिवस ती असं करीत राहिली, तिच्याकडे कुणाचेच लक्ष गेले नाही. पण अखेरीस पऱ्यांच्या लक्षात ही गोष्ट आली आणि त्यांनी तिला शिक्षा केली.

प्रत्येक रात्री त्या चिमुकल्या स्त्रिया- लांब बाह्या असलेले लालभडक चकाकणारे लांब झगे त्यांनी घातलेले होते- त्या साऱ्या जमिनीतून वर आल्या आणि नाचू लागल्या, गाऊ लागल्या, वेडीवाकडी तोंडे करू लागल्या आणि त्यांनी तिला रात्रभर झोपूच दिले नाही.

एके रात्री तिची आई उठून बसली आणि त्यांना पाहिले, आणि काठीने त्यांना हुसकावून लावले- आणि अचानक त्यांचे रूपांतर आलुबुखारच्या बियांमध्ये झाले! अशा रितीने त्या मुलीचा खोडकरपणा उघडकीस आला. नंतर ती खरोखरच खूप चांगली मुलगी झाली.

* * *

*जपानी परिकथेवरून अनुवादित*

कथा – ११

# राक्षस कोळी

फार प्राचीन ग्रंथांमध्ये असे म्हटले आहे की पूर्वीच्या काळी जपानमध्ये खूप राक्षस कोळी अस्तित्वात होते. दिवसभरात ते सर्वसाधारण कोळयासारखे दिसायचे, पण जशीजशी रात्र वाढत जायची, सारे गाढ झोपी जायचे, कसलाही आवाज नसायचा तेव्हा ते खूप खूप मोठे व्हायचे आणि भयंकर गोष्टी करायचे. त्या राक्षस कोळयांना अशी जादुई शक्ती प्राप्त होती की ते माणसाचं रूप घेऊन लोकांना फसवत. आणि अशा कोळयाबाबत खूप प्रसिद्ध अशी जपानी कथा आहे.

एकदा काय झाले की काही निर्जन ग्रामीण भागात एक झपाटलेले देऊळ होते. कुणीही त्या इमारतीत राहू शकत नव्हते कारण त्या राक्षसांनी त्याचा ताबा घेतलेला होता. त्या राक्षसांना मारण्याच्या हेतूने अनेक जपानी योद्धे (सामुराई) अनेकदा त्या ठिकाणी गेले. पण त्यांनी त्या देवळात प्रवेश केल्यानंतर त्यांचे काय झाले हे कुणी कधीच ऐकले नाही.

शेवटी एक जो त्याच्या धाडसीपणाबद्दल आणि समंजसपणाबद्दल प्रसिद्ध होता तो रात्रीच्या वेळी त्या देवळात पाळत ठेवण्यासाठी गेला. आणि त्याच्यासोबत असलेल्यांना तो म्हणाला, “जर सकाळपर्यंत मी जिवंत राहिलो, तर मी देवळातला ढोल वाजवीन.” नंतर तो एकटाच दिव्याच्या प्रकाशात पाळत ठेवण्यासाठी निघून गेला. जसजशी रात्र होत गेली तसा तो धुळीने माखलेल्या बुद्धाच्या मूर्तीला टेकू दिलेल्या वेदीखाली दबा धरून बसला. मध्यरात्र उलटून गेली तरी त्याला काही विचित्र दिसले नाही की काही आवाज ऐकू आला नाही.

नंतर अर्धे शरीर आणि एक डोळा असलेला राक्षस तेथे आला आणि म्हणाला, “हितोकुसाई!” (मनुष्यप्राण्याचा वास येतोय) पण त्या योद्ध्याने हालचाल केली नाही. तो राक्षस निघून गेला.

मग तेथे एक धर्मगुरू आला आणि तो सामिसेन इतक्या आश्चर्यकारकरित्या वाजवू लागला की त्या योद्ध्याला खात्री वाटली की तो माणसाचं ढोंग करीत आहे. म्हणून त्या योद्ध्याने तलवार उपसून झेप टाकली. त्याला बघितल्यावर धर्मगुरूला हसू फुटले आणि तो म्हणाला, “तर तुला वाटलं मी राक्षस होतो, नाही बरं! मी फक्त या देवळाचा धर्मगुरू आहे, त्या राक्षसांना दूर ठेवण्यासाठीच मी हे करतो. या सामिसेनचा आवाज तुला आवडत नाही काय? कृपया तू वाजव.”

आणि त्याने त्याला ते वाद्य दिले. त्याने ते अधाशीपणे आणि काळजीपूर्वक डाव्या हातात घेतले. पण तात्काळ ते वाद्य एका राक्षसी कोळयाच्या जाळयात रूपांतरित झाले आणि त्या धर्मगुरूचे राक्षस कोळीत रूपांतर झाले आणि त्या योद्ध्याला जाणवले की आपण त्या कोळयाच्या जाळयात गुरफटलो आहोत. त्याने शूरपणे धडपड केली आणि तलवारीने त्या कोळयाशी झुंज दिली. त्याने त्याला जखमी केले पण लगेच त्या जाळयामध्ये तो पुन्हा अडकला. इतका की तो त्याची स्वतःची सुटका करू शकत नव्हता आणि हालचालही करू शकत नव्हता.

तथापि तो जखमी कोळी सरपटत निघून गेला आणि सूर्य उगवला. थोड्या वेळातच लोक तेथे आले आणि त्या योद्ध्याला त्यांनी भयंकर जाळयात अडकलेले पाहिले आणि त्याची सुटका केली. त्यांनी जमिनीवर रक्ताच्या खुणा पाहिल्या आणि देवळाच्या बाहेर उजाड बागेत असलेल्या बिळापर्यंत त्या खुणांचा मागोवा घेतला. बिळाच्या बाहेर दुःखाने विव्हळण्याचा भयंकर आवाज येत होता. त्यांना तो जखमी राक्षस त्या बिळात दिसला. त्यांनी लगेच त्याला ठार मारले.

* * *

*जपानी परिकथेवरून अनुवादित*

कथा – १२

# म्हातारी जिचे कणकेचे गोळे हरवतात

फार फार पूर्वी एक विक्षिप्त म्हातारी होती- जिला हसायला आणि तांदळाच्या पीठाचे गोळे शिजवायला आवडायचे.

एके दिवशी जेवणासाठी ती तांदळाच्या पीठाचे गोळे बनवत असताना तिच्या हातून एक गोळा अनवधानाने खाली पडला आणि तिच्या छोट्याशा, मातीच्या स्वयंपाकघरातल्या बिळात घरंगळत गेला आणि नाहीसा झाला. त्या म्हातारीने बिळात हात घालून त्याच्यापर्यंत पोहोचायचा प्रयत्न केला, आणि अचानक जमिनीला मोठे विवर पडले आणि ती त्यात पडली.

ती बऱ्याच दूर अंतरावर पडली, पण तिला थोडीही इजा झाली नाही, जेव्हा ती पायावर उभी राहिली तेव्हा तिने पाहिले की ती एका रस्त्यावर उभी आहे, अगदी तिच्या घरासमोरील रस्त्यासारख्या रस्त्यावर. खाली बराचसा प्रकाश होता, आणि तिला भाताची खूप शेतीवाडी दिसत होती, पण त्यात कुणीही नव्हते. हे सारं कसं घडलं, मी तुम्हाला सांगू शकत नाही पण असं समजा की ती एका दुसऱ्याच देशात जाऊन पडली. ज्या रस्त्यावर ती पडली होती त्याला खूपच उतार होता. त्या गोळयांकडे व्यर्थपणे पाहत, ती विचार करू लागले की ते ह्या उतारावरून लांबवर खाली घरंगळत गेले असावेत. ती रस्त्यावरून खाली पळत गेली आणि ओरडलीः

"माझे गोळे, माझे गोळे! कोठे आहेत माझे गोळे?"

थोड्या वेळानंतर तिने पाहिले की पाषाण फिजो रस्त्याच्या बाजूला उभा आहे, आणि ती म्हणाली, "हे राजन् फिजो, माझे गोळे पाहिलेत का तुम्ही?"

आणि फिजो म्हणाला, "होय, मी तुझ्या गोळयाला थोड्या वेळापूर्वीच जाताना पाहिले. पण तू पुढे पळत जाऊ नकोस कारण तेथे खाली दुष्ट ओनि आहे, जो लोकांना खातो."

पण ती हसली, आणि पळाली. अजूनही ती ओरडतच होती, "माझा गोळा! माझा गोळा! कोठे आहे माझा गोळा?" आणि ती तिसऱ्या फिजोकडे आली, आणि तिने त्याला विचारले,

“अहो प्रिय स्वामी फिजो तुम्ही माझा गोळा पाहिला का?”

पण फिजो म्हणाला, “तुझ्या गोळ्याबद्दल आत्ता काहीही बोलू नकोस. तो बघ येथे आता ओनि येत आहे. माझ्या बाह्यांमागे मांडी घालून बैस आणि अजिबात आवाज करू नकोस.”

लवकरच ओनि जवळ आला आणि थांबला आणि आदराने वाकून फिजोला म्हणाला,

“नमस्ते, फिजोसाहेब!”

फिजोसुद्धा नम्रतेने म्हणाला, नमस्कार.

मग ओनिने अचानक हवेचा वास घेतला- दोन किंवा तीन वेळा संशयाने, आणि ओरडला “फिजो सान फिजो सान मला मनुष्य प्राण्याचा वास येतो आहे कोठून तरी- तुला नाही येत?”

“ओ,” फिजो म्हणाला, “तू काहीतरी गैरसमज करून घेतला आहेस.”

“नाही, नाही!” ओनि पुन्हा हवेत हुंगत म्हणाला. “मला वास येतोच आहे- मनुष्यप्राण्याचा वास!”

त्या म्हातारीला हसू आवरेना- “ती-ही-ही!” आणि ओनिने तोबडतोब आपला केसाळ हात फिजोच्या बाह्यांच्या मागे खाली नेऊन तिला बाहेर ओढून काढले. तरीही ती हसतच होती, “ती-ही-ही!”

“ओ! हा!” ओनि ओरडला.

मग फिजो म्हणाला, “काय करणार आहेस तू त्या चांगल्या म्हातारीचं? तू तिला काही इजा पोहचवायलाच नको.”

“मी नाही करणार,” ओनि म्हणाला. “मी तिला माझ्याबरोबर घरी घेऊन जाईन आमच्यासाठी स्वयंपाक करायला.”

“ते-ही-ही!” ती म्हातारी हसली.

“ठीक आहे,” फिजो म्हणाला. “पण तू तिच्याशी खरोखर दयाळूपणे वागायला हवं. तू जर तसं केलं नाहीस तर मला तुझा खूप राग येईल.”

“मी तिला काहीच इजा पोह्चवणार नाही,” ओनिने तसे वचन दिले. “पण तिला आमच्यासाठी थोडंसं काम करावं लागेल दररोज. बराय, टाटा फिजोभाऊ.”

नंतर ओनिने त्या म्हातारीला रस्त्याच्या खूप खूप खाली नेले, एक रूंद आणि खोल नदी येईपर्यंत, जेथे एक होडी होती. त्याने तिला होडीत बसवले आणि नदीच्या पलिकडे असलेल्या त्याच्या घरी नेले. ते खूप मोठे घर होते त्याने तात्काळ तिला स्वयंपाकघरात नेले आणि तिला सांगितले की माझ्यासाठी आणि इतर ओनि जे माझ्या सोबत राहतात त्यांच्यासाठी जेवण बनव. त्याने तिला लाकडाची भात क्षेपणी दिली आणि म्हणाला,

“तू ह्या पातेल्यामध्ये तांदळाचा फक्त एक दाणा टाक, जोपर्यंत ते पातेले काठोकाठ भरून जात नाही तोपर्यंत हे दाणे वाढत जाणार.”

म्हणून मग त्या म्हातारीने फक्त एक दाणा त्या पातेल्यात टाकला, ओनिने सांगितल्याप्रमाणे तिने क्षेपणीने ढवळायला सुरूवात केली, आणि जसे ती ढवळू लागली, एका दाण्याचे दोन झाले- नंतर चार, आठ –मग सोळा, बत्तीस, चौसष्ट आणि अशा प्रकारे आणखी... प्रत्येक वेळ ती क्षेपणी फिरवत गेली आणि त्यातले तांदूळ मोठ्या प्रमाणात वाढतच गेले. आणि काही मिनिटातच ते मोठे पातेले भरून गेले.

त्यानंतर, ती गमतीदार म्हातारी त्या जुन्या घरात खूप दिवस राहिली आणि प्रत्येक दिवशी तिने त्याच्यासाठी आणि त्याच्या मित्रांसाठी स्वयंपाक केला. त्या ओनिने तिला कधीही दुखावले नाही की तिला भीती दाखवली नाही, आणि जरी तिला खूप मोठ्या प्रमाणावर भात बनवायला लागला असे, तरी तिचे काम त्या जादूच्या क्षेपणीने पूर्णपणे सोपे झाले होते, कारण ओनि मानव प्राण्यांपेक्षा जास्त खातात.

पण तिला एकटे एकटे वाटायचे, आणि आपल्या छोट्याशा घरी परत जाऊन कणकेचे गोळे बनवायची तिला नेहमी इच्छा व्हायची. एके दिवशी सर्व ओनि कुठेतरी बाहेर गेले असताना तिने पळून जायचा प्रयत्न करायचा विचार केला.

तिने आधी जादूची क्षेपणी घेतली आणि कमरपट्ट्याखाली खोचली, आणि नंतर मग ती खाली नदीकडे गेली. तिला कुणीही पाहिले नाही, आणि ती होडीही तिथेच होती. ती त्या होडीत बसली आणि दूर गेली कारण तिला छान वल्हवता येत होते, ती लवकरच किनाऱ्यापासून दूर गेली.

पण नदी खूपच रूंद होती, आणि तिने अजूनपर्यंत एक चतुर्थांश अंतरही पार केले नव्हते, तेवढ्यात सर्व ओनि घरी परतले. त्यांनी पाहिलं की त्यांची स्वयंपाकीण गेली आणि

तिच्याबरोबर ती जादूची क्षेपणी सुद्धा! ते खाली नदीकडे पळाले आणि त्यांनी पाहिलं की ती म्हातारी जोरजोराने वल्हवित आहे.

असंही असू शकेल की ते पोहू शकत नव्हते, आणि अशा परिस्थितीत त्यांच्याजवळ होडीही नव्हती. त्यामुळे ते विचार करू लागले की आता त्या गमतीदार म्हातारीला पकडण्याचा एकच मार्ग होता आणि तो म्हणजे ती म्हातारी दुसऱ्या किनाऱ्यावर पोहोचण्यापूर्वी त्यांनी त्या नदीचे सर्व पाणी पिऊन टाकावे. म्हणून ते खाली गुढघ्यावर बसले आणि ती म्हातारी अर्ध्या वाटेवर पोहोचण्यापूर्वी त्यांनी ते पाणी पटापट प्यायला सुरूवात केली, पाणी पूर्णपणे संपत आले होते.

पण ते पाणी उथळ होईपर्यंत म्हातारी वल्हवत राहिली. ओर्निंनी पाणी पिणे थांबवले आणि त्यांनी उरलेले पाणी तुडवत पलिकडे जायला सुरूवात केली. नंतर त्या म्हातारीने वल्हे टाकून दिले, आपल्या कमरपट्ट्यातून जादूची क्षेपणी काढली, आणि ओर्निंकडे हलवली आणि विचित्र चेहरा केला. ते पाहून ओर्निंना हसू फुटले.

पण ज्या क्षणी ते हसले, त्या क्षणी त्यांनी प्यायलेले पाणी बाहेर आले आणि नदी पुन्हा पाण्याने भरून गेली. ओर्निंना नदी ओलांडता आली नाही, आणि ती गमतीदार म्हातारी सुरक्षितपणे दुसऱ्या बाजूला गेली आणि रस्त्यावरून जेवढे जलद पळता येईल तेवढी पळाली.

आपले घर येईपर्यंत तिने पळायचं थांबवलं नाही.

घरी पोहोचल्यानंतर तिला खूप आनंद झाला, कारण तिला जेव्हा वाटेल तेव्हा ती कणकेचे गोळे बनवू शकत होती. ह्या व्यतिरिक्त तिच्याजवळ तांदूळ बनवण्याची जादूची क्षेपणी होती. तिने त्या क्षेपणीच्या मदतीने खूप तांदूळ बनवून तिच्या शेजाऱ्यांना आणि प्रवाशांना ते विकले. आणि थोड्याच काळात ती श्रीमंत झाली.

*जपानी परिकथा*

कथा – १३

# मुलगा ज्याने मांजरीची चित्रे काढली

फार फार पूर्वी जपानमध्ये एक छोटेसे गाव होते. तेथे एक गरीब शेतकरी आणि त्याची बायको राहत होती. ती खूप चांगली माणसे होती. त्यांना खूप मुले होती आणि त्या सर्वांचा उदरविर्वाह करणं त्यांना खूप कठीण होतं. चौदा वर्षांचा मोठा मुलगा वडिलांना मदत करील इतका दणकट होता, आणि जेव्हा त्या लहान मुली जवळ जवळ चालू लागल्या तेव्हा त्या आईला मदत करायला शिकल्या.

पण सर्वात लहान मूल, छोटा मुलगा कष्टाचे काम करण्याच्या योग्यतेचा दिसत नव्हता. तो खूप हुशार होता,- इतर साऱ्या भावाबहिणींपेक्षा,- पण तो इतका दुबळा आणि किरकोळ होता की लोक म्हणायचे की तो कधीच पुरेसा मोठा होणार नाही. म्हणून त्याच्या आईवडिलांनी विचार केला की त्याला शतकरी बनण्यापेक्षा धर्मगुरू बनलेले अधिक उत्तम. एके दिवशी त्यांनी त्याला खेडेगावातील मंदिरात नेले, आणि तेथे राहणाऱ्या चांगल्या वृद्ध धर्मगुरूला त्यांनी विचारलं की आमच्या छोट्या मुलाला तुम्ही सेवक म्हणून ठेवून घ्याल का आणि एखाद्या धर्मगुरूला जे ज्ञान असावं ते तुम्ही त्याला शिकवाल का?

तो वृद्ध त्या मुलाशी ममतेने बोलला, आणि त्याने त्याला काही अवघड प्रश्न विचारले. त्याची उत्तरे इतकी कुशल होती की त्याने त्या छोट्या पोराला मंदिरात सेवक म्हणून ठेवून घेतले आणि त्याला धर्मगुरूपणाची शिकवण दिली.

वृद्ध धर्मगुरूने त्याला जे काही शिकवलं ते त्याने पटापट आत्मसात केलं, आणि सर्वच बाबतीत तो आज्ञाधारक होता. पण त्याच्यात एक दोष होता. अभ्यासाच्या वेळेला तो मांजरींची चित्रे काढायचा आणि जिथे त्याने ही चित्रे अजिबात काढायला नको होती तिथेच तो ही चित्रे काढायचा.

आपण एकटे आहोत असे जेव्हा त्याला आढळून यायचे तेव्हा तो मांजरींची चित्रे काढायचा. त्याने ती चित्रे धर्मगुरूच्या पुस्तकातील समासातील जागी, मंदिरातल्या आडोशाच्या चौकटीवर, भिंतीवर आणि खांबांवरही काढली. त्या धर्मगुरूने त्याला बऱ्याच वेळा सांगितले की हे बरोबर नव्हे, पण त्याने चित्रे काढायचे थांबवले नाही. ती त्याने रेखाटली कारण तो स्वतःला त्यापासून थांबवू शकला नाही. त्याला तो 'कलाकाराची प्रतिभा' म्हणायचा आणि ह्याच कारणाने

तो धर्मगुरूचा सेवक म्हणून पूर्णपणे योग्य नव्हता, चांगल्या सेवकाने पुस्तकांचा अभ्यास करायला हवा.

एके दिवशी त्याने कागदी आडोशाच्या चौकटीवर मांजरीची खूपच नामी चित्रे रेखाटली तेव्हा तो वृद्ध धर्मगुरू अत्यंत कठोरपणे म्हणाला, "माझ्या पोरा, तुला आत्ताच्या आत्ता ह्या मंदिरापासून लांब जायला हवे. तू कधीही चांगला धर्मगुरू होऊ शकणार नाहीस. पण कदाचित तू एक महान कलाकार होऊ शकतोस. आता मला तुला अखेरचा छोटासा सल्ला देऊ दे, आणि न चुकता तू तो कधीच विसरू नकोस- रात्रीच्या वेळी ऐसपैस मोठी जागा टाळायची छोट्या जागेत रहायचे!"

धर्मगुरूच्या सल्ल्याचा अर्थ त्या मुलाला कळला नाही. जेव्हा जाताना तो आपल्या कपड्याचे छोटेसे गाठोडे बांधत होता तेव्हा त्याने खूप खूप विचार केला, परंतु त्याला काही त्या शब्दांचा अर्थ कळू शकला नाही, आणि निरोप घेताना "बराय!" असे शब्द बोलण्याव्यतिरिक्त अधिक काही त्या धर्मगुरूला बोलण्याची त्याची हिम्मत झाली नाही.

अतिशय दुःखाने त्याने ते मंदिर सोडले, आणि आता काय करावे ह्याचा तो स्वतःशीच विचार करू लागला. जर तो सरळ घरी गेला असता तर त्याला खात्री होती धर्मगुरूची अवज्ञा केल्यामुळे त्याचे वडील त्याला शिक्षा करणार, म्हणून त्याच्या घरी जायची त्याला भीती वाटली. लगेच त्याला आठवले की बारा मैल अंतरावर एक दुसरे खेडे आहे, जेथे खूप मोठे मंदिर आहे. त्याने असे ऐकले होते की त्या मंदिरात बरेच धर्मगुरू आहेत, आणि त्याने असा निश्चय केला की आपण त्यांच्याकडे जायचे आणि आपल्याला त्यांचा सेवक म्हणून ठेवाल का असे त्यांना विचारायचे.

आता ते मोठे मंदिर बंद होते पण त्या मुलाला ह्या बाबतीत खरे काय हे ठाऊक नव्हते. ते बंद असण्याचे कारण असे होते की एका पिशाच्चाने त्या मंदिराच्या धर्मगुरूंना भीती घातली होती आणि त्या जागेचा ताबा घेतला होता. त्यानंतर एके रात्री काही शूर योद्धे त्या पिशाच्चाला मारण्यासाठी त्या मंदिरात गेले होते, पण त्यांना कधीच जिवंत पाहिले गेले नाही. ही गोष्ट त्या मुलाला कुणीही कधीही सांगितली नव्हती, म्हणून त्या धर्मगुरूंकडून आपल्याला दयाळू वागणूक मिळेल या आशेने तो त्या खेड्याकडे चालत गेला.

जेव्हा तो त्या खेड्यात पोहोचला तेव्हा आधीच अंधार पडलेला होता, आणि सर्व लोक अंथरूणात होते, पण मुख्य रस्त्याच्या टोकाला टेकडीवर असलेल्या त्या मंदिरात त्याने उजेड बघितला. लोक अशी गोष्ट सांगत होते की आश्रय मागणाऱ्या एकट्या दुकट्या प्रवाशाला भुरळ पाडण्यासाठीच ते पिशाच्च तेथे उजेड निर्माण करतात. तो मुलगा तात्काळ त्या मंदिराजवळ गेला

आणि त्याने दरवाजा ठोठावला. आतल्या बाजूने काहीही आवाज आला नाही. त्याने पुन्हा पुन्हा दरवाजा ठोठावला पण तरीही कुणी आले नाही. शेवटी त्याने हलकेच दरवाजा लोटला, आणि दरवाजा घट्ट लावलेला नाही हे पाहून तो अतिशय खूश झाला. मग तो आत गेला, आणि त्याने पाहिले की दिवा जळत होता- पण तिथे धर्मगुरू नव्हते.

त्याने विचार केला की काही धर्मगुरू लवकरच आणि खात्रीने येतील. तो खाली बसला आणि वाट पाहू लागला. नंतर त्याला दिसून आले की सर्व गोष्टी धुळीने काळपट झालेल्या आहेत आणि त्यावर दाट कोळीष्टके चढलेली आहेत. म्हणून त्याने मनाशी विचार केला की ही जागा स्वच्छ ठेवण्यासाठी धर्मगुरूंना नक्कीच एका सेवकाची गरज आहे. ह्या साऱ्या वस्तू त्यांनी धुळीने माखू का दिल्या ह्याचे त्याला आश्चर्य वाटले. तथापि त्याला आडोशाच्या पांढऱ्या चौकटी पाहून खूप आनंद झाला. त्यावर त्याला मांजरीची चित्रे रंगवता येणार होती. जरी तो थकलेला होता तरी त्याला एक लिखाणाची पेटी दिसली, आणि त्याने शाई तयार करून मांजरीची रंगीत चित्रे काढायला सुरूवात केली.

त्या आडोशाच्या चौकटीवर त्याने भल्या मोठ्या आणि खूप मांजरींची रंगीत चित्रे काढली. नंतर त्याला खूप झोप आली. त्या आडोशाच्या चौकटीजवळ तो झोपणार एवढ्यात त्याला धर्मगुरूंचे शब्द आठवले, "...ऐसपैस जागा टाळायची, छोट्या जागेत रहायचे!"

ते मंदिर खूप मोठे होते, त्यात तो एकटाच होता, आणि जरी त्याला ते पूर्ण समजले नव्हते तरी त्या शब्दांचा त्याने विचार केला- त्याला सुरूवातीला थोडा वेळ भीती वाटली- पण त्याने झोपण्यासाठी छोटीशी जागा शोधण्याचा पक्का निश्चय केला. त्याला एक सरकदरवाजा असलेले कपाट सापडले, आणि तो त्यात शिरला, आणि त्यात त्याने स्वतःला बंद करून घेतले. नंतर तो खाली लवंडला आणि गाढ झोपी गेला.

खूप उशीरा रात्री त्याला खूप भयंकर आवाजाने जाग आली- घोंगावण्याच्या आणि झटापटीच्या आवाजाने. तो इतका भयंकर होता की त्या छोट्या कपाटाच्या फटीतून पाहायलाही त्याला भीती वाटली. भीतीने श्वास रोखून तो तसाच स्तब्ध पडून राहिला.

मंदिरात जो प्रकाश होता तो नाहीसा झाला. पण तो भीषण आक्रोश मात्र सतत चालू राहिला- आणि त्याची भीषणता इतकी वाढली की संपूर्ण मंदिरच गदागदा हलू लागले. बऱ्याच वेळानंतर शांतता पसरली, पण तो मुलगा अजूनही हालचाल करायला घाबरत होता. कपाटाच्या त्या छोट्या दरवाज्याच्या फटीतून सकाळच्या सूर्याचा प्रकाश आत येईपर्यंत त्याने हालचाल केली नाही.

नंतर त्या लपलेल्या जागेतून तो अतिशय सावधपणे बाहेर आला, आणि त्याने सगळीकडे बघितले. पहिली गोष्ट त्याने पाहिली ती ही की त्या मंदिराची जमीन पूर्णपणे रक्ताने माखलेली होती. नंतर त्याने पाहिले की एक प्रचंड अवाढव्य उंदीर मध्यभागी मरून पडलेला आहे- पिशाच्च उंदीर- एखाद्या गाईपेक्षा मोठा!

पण कुणी किंवा कसं त्याला मारू शकलं? तेथे कुणी माणूस किंवा इतर प्राणी दिसत नव्हता. अचानक त्या मुलाने निरीक्षण केले की आदल्या रात्री त्याने ज्या मांजरींची चित्रे रंगवली होती त्यांची तोंडे रक्ताने ओली झालेली होती. आणि मग तेव्हाच त्याला हेही कळले की त्या सूज्ञ धर्मगुरूने त्याला का म्हटले की ऐसपैस जागा टाळायची, छोट्या जागेत रहायचे.

त्यानंतर तो मुलगा खूप प्रख्यात कलाकार झाला. त्याने रेखाटलेल्या मांजरी अजूनही जपानला येणाऱ्या प्रवाशांना दाखवल्या जातात.

* * *

कथा – १४

# सर फेडरिगोचा बहिरी ससाणा

काही काळापूर्वी फेडरिगो नावाचा एक तरूण फ्लॉरेन्समध्ये राहत होता, तो मेसर फिलिप्पो अल्बरिघी, ज्याने लष्करात सत्कृत्य गाजवले अशा सभ्य वैशिष्ट्यपूर्ण जमिनदाराचा टस्कनीतील मुलगा होता. आता असंख्य सभ्य गृहस्थांप्रमाणे तो प्रेमात पडला, कामिनी मोना जिओव्हाना, जी तिच्या काळातील फ्लॉरेन्समधील सर्वात सुंदर व आकर्षक ललना होती. तिचे प्रेम मिळवण्यासाठी व तिचे लक्ष वेधण्यासाठी घोड्यावरून भाला फेकीत युद्ध करणे, खेळाचे सामने भरवणे, करमणूक करणे, ह्यासाठी त्याने आपल्या मिळकतीतून संयम न ठेवता खर्च केला. पण ती सौंदर्यापेक्षा फारशी कमी निर्मळ नव्हती. त्याने तिच्याखातर केलेल्या गोष्टीची तिच्या लेखी शून्य किंमत होती व त्याची तिला काहीही पर्वा नव्हती. इकडून तिकडून सर्व सामर्थ्य पणाला लावून त्याला काहीच प्राप्त झाले नाही. अगदी सहजगत्या फेडरिगोची दौलत नाहीशी झाली आणि तो निष्कांचन झाला, फक्त दोनच गोष्टी त्याच्याजवळ शिल्लक राहिल्या त्या म्हणजे त्याच्या उदरनिर्वाहासाठी छोटीशी शेतजमीन आणि जगातील सर्वात उत्तम बहिरी ससाणा. पण सदैव प्रेमात असूनही ह्या कारणामुळे तो शहरात फार काळ राहू शकला नाही. त्याच्या इच्छेनुरूप तो कँपीजवळ जेथे त्याची थोडीशी शेतजमीन होती तेथे रहायला गेला. येथे तो गरिबी सहन करीत होता, कुणाजवळ काहीही न मागता बहिरी ससाण्याकडून शिकार करून घेत होता.

एके दिवशी योगायोगाने असे घडले की त्याच्या दुःखाच्या परमावधीची तीव्रता कमी झाली ती अशी की मोना जिओव्हानाचा नवरा आजारी पडला आणि आपण आता मरणार आहोत हे जाणून त्याने त्याचे मृत्यूपत्र तयार केले. तो खूप श्रीमंत असल्यामुळे त्याने त्याच्या मुलाला त्याच्या मागे वारसदार बनवून त्याला सर्व देऊन टाकले. जो आधीच तडफदार व चांगला मुलगा होता, मोना जिओव्हानाला त्याने त्याच्या नंतरचा उत्तराधिकारी बनवले. योगायोगाने त्याचा मुलगा कायदेशीर वारसाविना मरण पावला, आणि नंतर तो वारला. मोना जिओव्हाना, विधवा झाली म्हणून वसंत ऋतूत तिच्या मुलाबरोबर तिच्या जन्मभूमीकडे गेली (आमच्या महिलांनी असे वागावे असा त्या काळी रिवाजच होता.) जेथे फेडरिगोच्या मालकीची जमीन आसपास होती. त्या कारणामुळे दैवयोगाने हा युवक फेडरिगोचा जीवलग मित्र बनला आणि तो त्याच्या बहिरी ससाणा व शिकारी कुत्र्यांबरोबर आनंद घेऊ लागला. फेडरिगोच्या बहिरी

ससाण्याच्या भराऱ्यांचा त्याला पराकोटीचा आनंद होई, त्याची पराकोटीची इच्छा झाली की त्याला तो बहिरी ससाणा हवा. तथापि फेडरिगो त्याच्या बहिरी ससाण्यावर किती प्रेम करीत होता व त्याच्यासाठी ती खूपच अमूल्य गोष्ट होती हे तो जाणून होता. अशा ह्या गोष्टीमुळे तो युवक आजारी पडला. त्या कारणामुळे त्याच्या आईला खूप मोठे दुःख झाले. तो तिचे सर्वस्व होता आणि ती त्याच्यावर अंतःकरणापासून प्रेम करीत होती. दिवसभर ती त्याच्यासोबत बसून रहायची. ती त्याला सतत दिलासा द्यायची, अनेकदा ती त्याला विचारायची की त्याला कसली इच्छा आहे का, ती त्याचं सांत्वन करून विचारायची की त्याला काही हवं असल्यास ती पराकाष्ठेचा प्रयत्न करील. अनेकदा तिने त्या युवकास इच्छित देण्याची तयारी दाखवल्यावर तो म्हणाला-

"माझी आई, जर तू फेडरिगोचा बहिरी ससाणा मला आणून द्यायची व्यवस्था केली तर मी ताबडतोब बरा होईन."

हे ऐकल्यावर तिची मती कुंठित झाली. आता काय करावे ह्याचा ती विचार करू लागली. तिला ठाऊक होते की फेडरिगो दीर्घ काळापासून तिच्या प्रेमाची अभिलाषा करीत होता, पण तिच्याकडून त्याला कुठलाही प्रतिसाद मिळाला नाही. ह्यामुळे ती स्वतःशीच म्हणाली की मी कसा त्याला निरोप पाठवू किंवा बहिरी ससाण्याची त्याच्याकडे मागणी करू की ज्याबद्दल मी ऐकते आहे की तो त्याच्यासाठी आकाशात झेप घेतो, व त्याचा उदरनिर्वाह त्यावरच चालतो. मी त्या सभ्य गृहस्थाच्या जीवनातील एकमेव आनंद असणाऱ्या गोष्टीची इच्छा करून इतकी उद्दाम कशी होऊ शकते? ह्या विचाराने ती बेचैन झाली, यद्यपि जर तिने ती गोष्ट मागितली तर तिला ती मिळू शकते, तिला काय म्हणावे हे कळत नव्हते, उत्तर न देता ती तिच्या मुलाजवळ उभी होती. पण अखेरीस त्याच्यावरील तिच्या मायेने तिला नामोहरम केले आणि कुठल्याही किमतीवर त्याचे समाधान करायचा निश्चय तिने केला. कुणालाही न पाठवता स्वतः जाऊन त्याच्यासाठी ती गोष्ट आणायचे तिने ठरवले. त्यामुळे ती उत्तरली-

"माझ्या पोरा, निश्चिंत रहा आणि लवकरात लवकर आपण बरे होऊ असा विचार कर. कारण उद्या सकाळीच मी त्यासाठी तेथे जाईन आणि परत येऊन ती गोष्ट मी तुला आणून देईन."

ह्यामुळे तो युवक इतका सुखावला की त्याच दिवशी त्याच्या तब्येतीत काहीशी सुधारणा झाली.

दुसऱ्या दिवशी सकाळी ती एका स्त्रीला तिच्या सोबतीला म्हणून घेऊन गेली. काही वेळ चालल्यानंतर त्या फेडरिगोच्या छोट्याशा झोपडीपर्यंत पोहचल्या आणि त्यांनी त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त केली. शिकारीचा दिवस नसल्यामुळे तो बागेत काहीतरी काम करीत होता. परंतु जेव्हा त्याने ऐकले की मोना जिओव्हाना फाटकाजवळ असून त्याला भेटण्याची इच्छा व्यक्त करते आहे, तेव्हा तो आनंदाने त्या दिशेकडे धावतच गेला. त्याला स्वतःलाच त्या गोष्टीचे नवल वाटले होते. जेव्हा तिने त्याला येताना बघितले, तेव्हा ती विनयशील उत्सुकतेने त्याला भेटायला गेली आणि विनम्रतेने त्याला नमस्कार करीत म्हणाली-

"गुड डे टू यू, फेडरिगो." आणि पुढे म्हणाली, "तुम्ही माझ्यावर प्रेम करताना खूप काही गमावलं त्याची मी पर्वा केली नाही. त्या नुकसानभरपाईसाठी मी येथे आलेय. मी असं ठरवलं आहे की तुमच्याकडे माझ्या मैत्रिणीबरोबर घरगुती पद्धतीने जेवण करावं."

फेडरिगोने नम्रपणे उत्तर दिले, "हे वनिता, तुमच्याकडून प्राप्त झालेली कुठलीही हानी मी स्मरणात ठेवली नाही, पण खूपच छान, निदान तुमच्यावर माझं नितांत प्रेम होतं आणि आहे आणि खरं म्हणजे ही तुमची मैत्रीपूर्ण भेट मला मी आत्तापर्यंत तुमच्यासाठी आधीच उधळलेल्या गोष्टींपेक्षा अधिक प्रेमाची आहे; हे जरी खरे असले तरी तुमच्या गरीब यजमानाकडे तुम्ही आलात हे काही कमी नाही."

असं म्हणून त्याने विनम्रतापूर्वक त्याला आपल्या घरात नेले आणि तेथून तिला बागेत नेले जेथे तिच्यासोबत कुणीही नव्हते. तो म्हणाला-

"बाईसाहेब, एका कष्टकऱ्याची आदरणीय पत्नी तुमच्यासोबत असल्याने मी टेबल मांडण्यासाठी जातो."

त्याची गरिबी अगदी कमालीची असली तरी, त्याने त्याच्या संपत्तीची मोठ्या प्रमाणात उधळपट्टी केली असली, तरी त्याला ऐन वेळी उभ्या ठाकलेल्या गरजेला कसे तोंड द्यावे ते कळत होते; पण ह्या सकाळी त्याला एकही गोष्ट सापडली नाही जिच्या सहाय्याने त्या स्त्रीचा सन्मान करावा, ज्या स्त्रीच्या प्रेमाखातर त्याने अगणित लोकांचा सन्मान केला होता. तो चिंतेने पूर्णपणे भांबावून गेला. तो इकडे तिकडे पळत दुर्दैवी नशीबाला शिव्या घालीत होता. एक तास उशीर झाला आणि त्या उच्चकुलीन स्त्रीसाठी काहीतरी छान करावे अशी त्याची इच्छा होती आणि त्यासाठी कुणाकडे त्याला विनवणी करायची नव्हती (त्याच्या कामगाराकडे सुद्धा नव्हे). त्याचे डोळे त्या उत्तम बहिरी ससाण्याकडे वळले जो पिंजऱ्यातील आडव्या दांडीवर उभा होता आणि

दुसरे काहीही साधन नसल्याने त्याला तो गुबगुबीत पक्षी त्या स्त्रीसाठी योग्य वाटला. आणि मनावर ताबा न ठेवता, काहीही एक विचार न करता त्याने त्याची मान पिरगाळली आणि स्वयंपाकघरातील मोलकरणीला हुकूम सोडला की त्याची पिसे उपट आणि त्याला भाजण्यासाठी लोखंडी सळईत घाल आणि काळजीपूर्वक त्याला भाजून टाक. आणि जेव्हा ही सारी तयारी होईल तेव्हा त्याला टेबलावर अंथरलेल्या पांढऱ्याशुभ्र कपड्यावर ठेव. नंतर तो मोठ्या आनंदी चेहऱ्याने बागेत बसलेल्या त्या स्त्रीकडे गेला, त्याने सांगितले की तिच्यासाठीचे जेवण तयार आहे. त्यानंतर ती स्त्री तिच्या मैत्रिणाबरोबर उठली आणि टेबलाजवळ ते बसले. आणि आपण कशाचा आस्वाद घेतोय हे ठाऊक नसताना तिने तो छान बहिरी ससाणा खाल्ला. तेव्हा फेडरिगो मोठ्या आदरातिथ्याने तिला वाढत होता.

टेबलावरून उठल्यावर त्यांनी मैत्रीपूर्ण संभाषणात काही वेळ घालवल्यानंतर त्या स्त्रीला असे वाटले की आता आपण कशासाठी आलो होतो हे सांगायची वेळ आलीय आणि सौजन्यपूर्णतेने फेडरिगोकडे वळत तिने सुरूवात केली.

"फेडरिगो, जर तुमच्या जीवनाच्या अतीताबद्दल तुम्हाला स्मरत असेल आणि माझा निर्धार पाहून तुम्ही असे समजला असाल की ही कठोरता आणि निष्ठुरता आहे. मला शंकाच नाही की तुम्हाला कळले असेल की मुख्यत्वे करून मी येथे का आले आहे. पण जर तुम्हाला मुले असती किंवा आहेत तर मुलांबद्दल तुम्हाला किती प्रेम व शक्ती असते ह्याची कल्पना असावी आणि मला खात्री आहे की त्याबद्दल तुम्ही मला क्षमा कराल. तथापि तुम्हाला काहीही नाही पण मला आहे. इतर आयांसारखी माझीही या निर्बंधांपासून सुटका नाही, जे आज्ञा पाळायला माझ्यावर बळजबरी करतात. याप्रमाणे मला दिसून आले की माझ्या इच्छेविरूद्ध, साऱ्या प्रयोजनांविरूद्ध आणि हक्कांविरूद्ध मला आपल्याकडून भेटवस्तू हवी आहे जी तुम्हाला अतिशय प्रिय आहे आणि तुमच्या करमणुकीचे साधन, सांत्वनकारक पराकाष्ठेचा मार्ग हा एकाच गोष्टीत शिल्लक आहे. ह्या तुमच्या अतिदुर्दैवी परिस्थितीत ही भेटवस्तू म्हणजे तुमचा बहिरी ससाणा, ज्याच्याशी माझ्या मुलाचे प्रेमाचे गाढ नाते जोडले गेले आहे, जर मी त्याला देऊन त्याची इच्छा पूर्ण करू शकले नाही तर ते त्याला कदापि सहन होणार नाही, ही त्याची कमजोरी आहे जिच्यात तो आता आहे. म्हणून ह्या गोष्टीबद्दल मी त्याला पारखा होऊ देणार नाही. म्हणून मी तुमची विनवणी करते की तुमच्या माझ्यावरील प्रेमाखातर नव्हे- त्यामुळे मी तुम्हाला भाग पाडणार नाही- तर माझ्याविषयीचं तुमचं मोठं औदार्य, इतर व्यक्तींपेक्षा तुम्ही दाखवलेलं सौजन्य, की ज्याने तुम्हाला ते प्रदान करण्यात आनंदच होईल आणि मी असं म्हणू शकेन की माझ्या छकुल्याला नवजीवन मिळाले आणि त्यातून मी तुमची सर्वदा ऋणी राहीन."

फेडरिगो, जेव्हा त्याने ऐकले की ती स्त्री काय मागते आहे आणि तो तिला सहाय्य करू शकत नाही हे जेव्हा त्याला कळले, कारण त्याने तेच तिला खाऊ घातले होते, तेव्हा तिच्या उपस्थितीतच त्याने रडायला सुरूवात केली- एका शब्दानेही त्याने उत्तर दिले नाही; तेव्हा तिला असे वाटले की त्याला अतिशय प्रिय असलेल्या बहिरी ससाण्यापासून त्याला मुकावे लागेल म्हणून त्याला फारसे बोलता येत नसेल, तथापि तिने मनाचा निग्रह केला आणि त्याचं रडू थांबेपर्यंत, फेडरिगोचं उत्तर येईपर्यंत ती थांबली- आणि अशा रितीने तो तिच्याशी बोलू लागला-

"बाईसाहेब आत्तापर्यंत देवाची कृपा होती की माझं प्रेम तुमच्यात रहावं. अनेक गोष्टीत नशिबाने त्याचे शत्रुत्व सिद्ध केले आणि प्रसंगी मला खूप दुःख दिले. पण ह्या साऱ्या गोष्टी सांप्रतदृष्टीने क्षुल्लक होत्या ज्यांनी मला येथून पुढे कधीच मनाची शांतता लाभणार नाही. विचार केला तर ह्या माझ्या दरिद्री घरी- येथे तुम्ही आलात (जेथे जेव्हा मी धनवान होतो तेव्हा तुम्ही येथे येण्याचे कधीही मनात आणले नव्हते) आणि माझ्याकडे किरकोळ भेटवस्तूंची मागणी केली नव्हती. आणि दैव असे की तुम्ही आता येथे येऊन काहीतरी मागताहात जे मी देऊ शकत नाही, आणि का देऊ शकत नाही हे मी थोडक्यात सांगतोः

जेव्हा मी तुमच्या विनमन्रतेने केलेल्या अनुग्रहाबाबत ऐकले आणि माझ्या सोबत तुमच्या जेवणाच्या इच्छेबाबतही तुमच्या श्रेष्ठतेला आणि योग्यतेला अनुलक्षून, तुमच्या भावनांची कदर करून ठरवले की तुम्ही योग्यतेस पात्र आहात आणि माझ्यासोबत मांसाहाराचे जेवण घेण्यासही. कुठल्याही गोष्टीपेक्षाही मौल्यवान, माझ्या अधिकारातील ज्या कारणास्तव मी स्वतःशीच विचार केला, बहिरी ससाणा ज्याची तुम्ही नुकतीच मागणी केली आणि खाण्यासाठी तो गुबगुबीत असल्यामुळे, मी विचार केला की तुमच्यासाठी हे योग्यतेचे अन्न आहे आणि आज सकाळी तुमच्या ताटात ते त्याचे भाजलेले मांस मी वाढले. मी विचार केला होता त्याचा निकाल लावायचा पण मला आता असे दिसते की तुम्ही त्याची अभिलाषा वेगळ्या पद्धतीने करताहात, ज्यामुळे मला अती तीव्र दुःख मिळाले, ह्यात मी तुमची सेवा करू शकत नाही. ह्यामुळे मला सदैव शांती मिळणार नाही."

असे म्हणून, त्याने पुरावा म्हणून तिच्या पुढ्यात त्याचे पंख, पाय आणि चोच ठेवली. प्रथमतः त्या बाईने ऐकल्या आणि पाहिल्याबरोबर त्या बहिरी ससाण्यास मारून टाकल्याबद्दल व त्या स्त्रीला ते खाऊ घातल्याबद्दल त्याला खूपच दूषण दिले, पण मग मनातून तिला त्याच्या आत्म्याचा आदर वाटला, जे त्याचे दारिद्र्य नष्ट करू शकत नव्हते.

अशारितीने बहिरी ससाण्याची इच्छा न धरता आपल्या मुलाच्या आरोग्याच्या सुरक्षिततेसाठी समस्त विषण्णतेसह तिने त्याचा निरोप घेतला आणि मुलाकडे परत गेली. आणि

बहिरी ससाणा आता नाही, किंवा दुर्बलतेतून जी त्याने ओढवून घेतली होती काही थोड्या दिवसांसाठी त्याच्या आईचं मोठं दुःख त्याला मिळालं.

आता जरी ती, काही वेळा दुःख आणि अश्रूत बुडालेली असली तरी तिच्याजवळ भरपूर संपत्ती होती आणि ती अजूनही यौवनात होती, तेव्हा तिच्या भावांनी अनेकदा तिला पुन्हा विवाह करायची जबरदस्ती केली. तिला तथापि तशी इच्छा नव्हती, पण त्यांनी खूपच आग्रह धरला, आणि फेडरिगोची योग्यता आठवून आणि अलिकडचे त्याचे औदार्य, ज्यात त्याने तिच्या आदरातिथ्य आणि सन्मानासाठी त्याच्या बहिरी ससाण्याचा बळी दिला, ती तिच्या भावांना म्हणाली—

"मी जशी आहे तशीच मला राहू द्या हेच मी पसंत करते, पण जेव्हा तुमचा आग्रहच असेल की मी विवाह करावा तर मी फेडरिगो डेगली अल्बेरिघी शिवाय कोणालाच पसंत करणार नाही."

त्यावर तिचे भाऊ तिचा उपहास करीत म्हणाले, "मूर्ख! काय म्हणालीस तू? कशी इच्छा करतेस तू त्याची? काय आहे त्याच्याजवळ?"

ती त्यांना म्हणाली, "माझ्या भावांनो, मला ठाऊक आहे की तुम्ही म्हणालात तसेच ते आहेत पण ज्या माणसाजवळ संपत्ती आहे अशा माणसाऐवजी ज्याच्याजवळ औदार्याची संपत्ती आहे तो मला अधिक पसंत आहे."

तिच्या भावांनी, तिच्या मताचा कल ऐकून आणि फेडरिगो जरी गरीब असला हे ठाऊक असून तिला तोच हवा, त्यांनी तिचा हात तिच्या संपत्तीसह त्याच्या हाती दिला, आणि तो, ज्याने तिच्यावर अतिशय प्रेम केले ती स्त्री त्याला पत्नी म्हणून मिळाली आणि तिच्यामुळे तो पुन्हा श्रीमंत झाला व तिच्या सहवासात त्याचे अखेरचे दिवस संपूर्णपणे संतोषात गेले आणि त्याने त्या मिळालेल्या ऐश्वर्याची उत्तम काळजी घेतली.

*Giovanni Boccaccio*

*हे या कथेचे इटालियन लेखक व कवी होते.*

*(16 June 1313- 21 December 1375)*

कथा – १५

# कुलीन वारसा

- *श्री. एम्. नवनिथकृष्णा बोस*

*(मूळ इंग्रजीत) IATEFL २००३ वरून भाषांतरित*

'मदन' हा त्याच्या आईचा एकुलता एक मुलगा होता. तिच्या विवाहानंतर बऱ्याच वर्षांनी त्याचा जन्म झाला होता म्हणून तिचा त्याच्यावर खूप जीव होता. तो रूपवान आणि बुद्धिमान तरूण कुमार झाला. तो अध्ययनात अतिशय बुद्धिमान होता आणि त्याच्या आईस त्याचा खूप अभिमान होता. गावातील प्रत्येकाला ती त्याच्याविषयी सांगायची आणि बहुतेकांना तिच्याविषयी असूया वाटायची.

जेव्हा त्याने त्याचे अध्ययन संपवले, तेव्हा त्याला जवळच्याच शहरात नोकरी लागली, आणि त्याला आपल्यापासून लांब पाठवायचे ह्या कल्पनेने तिला अतीव दुःख झाले. त्यालाही फारसा आनंद वाटला नाही पण ती नोकरी छान होती आणि म्हणून तो शहरात गेला. तो त्याच्या मित्राबरोबर एका खोलीत रहायचा आणि आठवड्याच्या अखेरीस आईला भेटायला जायचा.

आनंदाच्या भरात त्याच्या आईने विचार केला की त्याचे लग्न करून टाकायला हवे. जवळच्याच गावातील श्रीमंत घराण्यातील मुलीशी त्याचे लग्न निश्चित झाले व थाटामाटात सोहळा पार पडला. नवीनच लग्न झाल्यामुळे त्या दोघांना मदत व्हावी म्हणून त्यांच्या सोबत शहरात गेली, पण मदनच्या बायकोला ते आवडले नाही. म्हणून ती वारंवार तिच्या नवऱ्याला सांगायची की त्याच्या आईने खेड्यात परत जावे. मदनला खूप वाईट वाटले पण तो त्याच्या बायकोच्या विरोधात काहीच बोलू शकत नव्हता, कारण ती खूप तापट स्वभावाची होती. त्यांच्यात नेहमी भांडणे होऊ लागली आणि त्याच्या आईने खेड्यात परत जायचे ठरवले.

वर्षे निघून गेली, मदनला मुलगा झाला. मदनचे वडील वारले होते, त्यामुळे त्याच्या आईला त्याच्याकडे शहरात जाणे भाग होते. मदनच्या बायकोने सासूला अतिशय वाईट वागणूक दिली. ती तिला खूपच कमी खायला द्यायची आणि एवढेच नाही तर तिने सासूला एक गाडगेसुद्धा दिले. मदन खूप दुःखी झाला पण तो त्याच्या बायकोला ताब्यात ठेवू शकत नव्हता. त्याच्या मुलाचं त्याच्या आजीवर खूप प्रेम होतं पण ह्या कारणास्तव त्याची आई त्याला अनेकदा मार द्यायची.

ती म्हातारी खूप आजारी पडली आणि एके दिवशी वारली. मदन आणि त्याच्या मुलाला खूप रडू आले पण मदनच्या बायकोला काहीच वाईट वाटले नाही. थोड्याच दिवसांनंतर तिने त्या म्हातारीचे कपडे आणि इतर वस्तू घराबाहेर फेकून दिल्या. तो लहान मुलगा पळतच बाहेर गेला आणि त्या जुनाट निरूपयोगी वस्तूंमधून ते मातीचे गाडगे त्याने उचलले. “कशाला ती घाणेरडी वस्तू तू उचललीस?” त्याच्या आईने त्याला संतापाने विचारले. तेव्हा तो शांतपणे म्हणाला, “आई, तू म्हातारी होशील ना तेव्हा तुझ्यासाठी मी त्याचा उपयोग करीन.”

मित्रहो

पुस्तकं वाचून कोणी शहाणं होतं का?

हो! आम्ही म्हणतो होतं. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. इतर प्राण्यांना काही प्रमाणात त्यांचे जन्मदाते थोडंफ़ार शिक्षण देतात. पण मानव हा असा प्राणी आहे ज्याला पुर्वी जगलेल्या आणि आता जिवंत नसलेल्या माणसांचे अनुभवही शिकता येतात . ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात. म्हणून वाचा. वाचत रहा. इतरांना वाचायचा आग्रह करा. वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे.

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

esahity@gmail.com

www.esahity.com